## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी, ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितारात थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड, श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे, कोल्हार बु॥ 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२१ मंगळवार, दि. २४ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# ...आता फौजदारी खटले मागे घेणार

## राज्य सरकारचा मोठा निर्णय: शासनाकडून आदेश जारी

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राजकीय आणि सामाजिक आंदोलनांशी संबंधित प्रलंबित गुन्ह्यातील आरोपपत्र दाखल केलेले सर्व खटले मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत. गृह विभागाने यासंदर्भातील शासकीय निर्णय (जीआर) २० जून रोजी जारी केला आहे. या निर्णयानुसार, फक्त तेच खटले मागे घेतले जातील ज्यात ३१ मार्च २०२५ पूर्वी आरोपपत्र दाखल केले गेले होते. अशा सर्व खटल्यांचा सरकारकडून मागोवा घेऊन ते मागे घेण्यात येणार आहेत.**





दरम्यान, राज्य सरकारने याआधी जारी केलेल्या आदेशात ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत ज्या प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले गेले आहे ते मागे घेतले जातील, असे म्हटले होते. मात्र, आता सरकारने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला असून ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय झाल्याने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांच्याकडून, सार्वजनिक हिताच्या व वेगवेगळ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घेराव घालणे, मोर्चे काढणे, निदर्शने करणे आदी स्वरुपाचे आंदोलनाचे मार्ग स्वीकारले जातात. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हे दाखल होऊन, तपासानंतर न्यायालयात दोषारोपपत्रे दाखल केली जातात. निवडणुकीनंतर नव्याने सत्तेवर आलेले सरकार अशा खटल्यांचा आढावा घेऊन राजकीय आणि सामाजिक आंदोलनात दाखल झालेले खटले मागे घेते.

राज्य गृह विभागाने एका आदेशात म्हटले होते की, ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले सर्व खटले मागे घेण्यात येतील. अधिकाऱ्याने सांगितले की, तथापि काही प्रकरणे अशी होती, ज्यात या तारखेनंतर आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यांनी सांगितले की, शुक्रवारी जारी केलेल्या सरकारी प्रस्ताव किंवा आदेशानुसार, सामान्य जनतेच्या हितासाठी आंदोलन करणाऱ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्त्यांविरुद्ध दाखल केलेले गुन्हे, ज्यात या वर्षी ३१ मार्चपर्यंत आरोपपत्र दाखल करण्यात आले होते, ते मागे घेण्यात येतील.

### मराठा–ओबीसी आंदोलकांना दिलासा

दरम्यान, मराठा आरक्षणप्रश्नी मराठा समाज आणि ओबीसींच्या प्रश्नावर ओबीसी समाजाने विविध आंदोलने केले होते. तसेच काही ठिकाणी रास्ता रोको करण्यात आला होता. यामुळे अनेक आंदोलकांवर कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा फटका राज्य सरकारला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बसण्याची शक्यता निर्माण झाल्याने सरकारने हा निर्णय तातडीने घेत त्यासंदर्भात शासन आदेशही जारी केला. या निर्णयामुळे मराठा आणि ओबीसी आंदोलकांना दिलासा मिळणार आहे.

# दिव्यांगांना साहित्य वाटपात जिल्हा अव्वल

## डॉ. सुजय विखे पाटील; स्व. परजणेंच्या पुण्यस्मरणानिमित्त साधनांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : देशातील दिव्यांगांना मदत व्हावी, या दृष्टिकोनातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजना आणली या योजनेच्या माध्यमातून देशातील दिव्यांग, वयोवृद्धांना सहाय्यक साधने वाटपासाठी बजेटमध्ये एका वर्षाकरिता ७० कोटींची तरतूद करण्यात आली. त्यापैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात एकाच वर्षात ४५ कोटी रुपयांची सहाय्यक साधने आणणारा देशातील एकमेव खासदार ठरलो आणि त्याच माध्यमातून सर्वाधिक चाळीस हजार लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणारा अहिल्यानगर जिल्हा हा देशात प्रथमस्थानी राहिला आहे, असे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे.



कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथे स्व. नामदेवरावजी परजणे पाटील यांच्या २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त संवत्सर परिसरातील २१० दिव्यांग, वयोवृद्धांना प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र, अहिल्यानगर यांच्यामार्फत सहाय्यक साधनांचे दि. २२ जून रोजी वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. विखे पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व नामदेवरावजी परजणे पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पान ४

> कोपरगाव तालुक्यात अनेक प्रश्न आहेत. त्याच्यावर बोलणे अपेक्षित आहे. त्याला वाचा फोडणे अपेक्षित आहे. परंतु, दुर्दैवाने यावर बोलल्या जात नाही. परंतु या पुढील काळात असे होणार नाही. कोपरगाव तालुक्यातील प्रत्येक गावात मोर्चेबांधणी करून तालुक्यातील जनतेला बरोबर घेवून सर्वसामान्यांचे, प्रश्न सोडविण्यासाठी राजेश परजणे व आम्ही प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- डॉ. सुजय विखे पा, माजी खासदार**

# कृषी पतसंस्था सभासदांना कर्ज देणार

## सभापती राम शिंदे; 'कृषी' पतसंस्थेची सभा खेळीमेळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्व सभासदांना पंधरा लाख रुपयांचे तात्काळ कर्ज यापुढील काळामध्ये देण्यात येणार आहे, अशी घोषणा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केली.

जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित यांची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये चेअरमन संतोष सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व कृषी संचालक रफिक नाईकवाडी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे, जिल्हा कृषी अधीक्षक पुणे संजय काचोळे, उपविभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाट, सुधीर शिंदे, यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.





प्रा. शिंदे म्हणाले की, मागील ४० वर्षांपासूनची विभागातील सर्व कर्मचारी सभासदांसाठी ही पतसंस्था अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत असल्याचे दिसू येते. या संस्थेचे चेअरमन व सर्व संचालकांनी नुकताच सभासदांसाठी शैक्षणिक व वैद्यकीय खर्चासाठी तात्काळ १५ लाख रुपयांची कर्ज देण्याची योजना या ठिकाणी जाहीर केली आहे ती निश्चितच कौतुकास्पद आहे. सभासदांच्या हिताचा कारभार या पुढील पान ४

# विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

## वैजूबाभळगाव येथील घटना; सर्वत्र हळहळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील वैजूबाभळगाव येथील सुशांत कंसराज भवार अंदाजे वय वर्षे १७ हा तरूण सोमवारी जनावरे चारण्यासाठी शेताकडे गेला असता जवळच असलेल्या एका विहिरीतून जनावरांसाठी पाणी काढत असताना विहिरीत पडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने वैजूबाभळगावसह परिसरातून मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



ही घटना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. अहिल्यानगर येथे आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या एकुलत्या एक मुलाचा विहिरीत बुडून झालेल्या मृत्यूने भवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

विहिरीत ५० ते ६० फुटापर्यंत पाणी असल्यामुळे सुशांतचा मृतदेह बाहेर काढणे ग्रामस्थांसाठी अशक्य होते.

गावातील ग्रामस्थांनी तात्काळ आ. मोनिका राजळे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डीले, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांच्या मदतीने आपत्ती व्यवस्थापन पथक अहिल्यानगर तसेच पाथर्डी नगर परिषदेच्या अग्निशमनला तात्काळ बोलावले. त्यानंतर आपत्ती व्यवस्थापन पान ४

# अध्यात्मिक वारसा अखंड सुरू ठेवा

## आ. संग्राम जगताप; संत निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो वारकरी पंढरपूरच्या दिशेने पायी दिंडी सोहळ्यांमधून विठुरायाच्या दर्शनासाठी मार्गस्थ होत असतात. या भक्तिभावाने आनंदीमय वातावरणात नगर जिल्ह्यातूनही विविध संतांच्या दिंड्या मार्गस्थ होत असून, त्याचाच एक भाग म्हणून संत निवृत्तीनाथ महाराज समाधी पालखी पायी दिंडी सोहळ्याचे स्वागत आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, संत निवृत्तीनाथ महाराजांच्या विचारांचा वारसा वारकऱ्यांच्या दिंडीच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या पुढे जात आहे. आपल्या संस्कृतीचा आत्मा असलेली ही परंपरा प्रत्येक घराघरात पोहोचवण्याचे कार्य वारकरी करत आहेत. भगव्या पताका हातात घेऊन हरिनामाचा गजर करत चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पावन स्पर्शाने संपूर्ण परिसर नवचैतन्याने भारलेला आहे. सूर्य-चंद्र असेपर्यंत हा पान ४



### अविनाश घुले यांनी परंपरा सुरू ठेवली

अध्यात्मिक पवित्र सोहळ्याच्या निमित्ताने मार्केट यार्ड येथे हमाल पंचायतच्या वतीने कै. शंकरराव घुले यांनी सुरू केलेली वारकऱ्यांच्या सेवेची परंपरा आजही त्यांचे बंधू माजी सभापती अविनाश घुले यांनी श्रद्धेने पुढे चालवली आहे.

# ...आता पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात थोरातांचे जीवनकार्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संपूर्ण देशातील सहकारासाठी आदर्श तत्व व विचार देणारे थोर स्वातंत्र्यसैनिक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे सहकारातील योगदान, त्यांचे जीवन कार्य आणि राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखालील देशासाठी दिशादर्शक असलेल्या अमृत उद्योग समूहातील सहकाराचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.



एम कॉमच्या अभ्यासक्रमात भाऊसाहेब थोरात यांचे जीवन कार्याचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती दुर्गाताई तांबे यांनी दिली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रम विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून यामध्ये संगमनेर येथील स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे जीवन कार्य व अमृत उद्योग समूहाचा समावेश करण्यात आला आहे.

ग्रामीण, निमशहरी आणि शहरी भागामध्ये आर्थिक समृद्धी निर्माण करणारा सहकार हा अत्यंत महत्त्वाचा असून या विषयाची विद्यार्थ्यांना गोडी निर्माण व्हावी, याकरीता सहकार क्षेत्राचा विज्ञान व कला शाखेच्या द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सहकार क्षेत्रामध्ये मोठे काम उभे पान ४

# माध्यमिक विभागातही बनावट दिव्यांग

**महेश रक्ताटे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : प्राथमिक शिक्षण विभागात काहींनी बदल्या टाळण्यासाठी बोगस दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र मिळविले होते. या प्रकरणी जिल्ह्यातील काही शिक्षकांवर गुन्हे दाखल झालेले आहे.

हे बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचे लोण माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांपर्यंत पोहचलेले आहे. माध्यमिक शिक्षण विभागातही काही बनावट दिव्यांग प्रमाण मिळविलेले शिक्षक आहेत. याकडे आता शिक्षण विभागाने लक्ष घालून बनावट प्रमाणपत्र असणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

प्राथमिक शिक्षण विभागातील काही शिक्षकांनी बदली प्रक्रियेतून सुटण्यासाठी एजंटांनी हाताशी धरून बोगस प्रमाणपत्र मिळविले होते. या बोगस प्रमाणपत्राची संख्या एकमागून एक वाढत गेली. एक दिवस त्याची पोलखोल झाली. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने बोगस प्रमाणपत्राची पडताळणी केली. त्यात काही बोगस प्रमाणपत्र आढळून आले. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.





शिक्षण विभागातील गोंधळ (भाग-३)

ही कारवाई टाळण्यासाठी तत्कालीन जिल्हा परिषदेतील पदाधिकाऱ्यांनी प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रशासनाने ठोस भूमिका घेवून गुन्हे दाखल केले. हे प्रकरण आता न्यायालय प्रविष्ठ आहे. प्राथमिक शिक्षका प्रमाणेच माध्यमिक शाळेतील काही शिक्षकांनी बोगस प्रमाणपत्र मिळवून प्रशासनाला सादर केलेले आहे.

त्यांनी या बनावट बोगस प्रमाणपत्राच्या माध्यमातून त्यांच्या संस्था पातळीवर त्यांनी बदलीतून सुटका करून घेतलेली आहे. तसेच काहींनी या बनावट प्रमाणपत्राचा वापर करून शासकीय सवलती लाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्राथमिक शिक्षण विभागातील बोगस प्रमाणपत्राचा बोलबाला झाल्यानंतर माध्यमिक विभागातील बोगस प्रमापत्रांची संख्या कमी झालेली आहे. परंतुज्यांनी प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यांची चौकशी मात्र झालेली नाही. त्यामुळे माध्यमिक शिक्षण विभागाने सर्वच प्रमाणपत्रांची चौकशी करावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.......... (क्रमशः)

### शाळांतील लिपिकांना सर्वच माहिती

जिल्ह्यातील शाळांमधून कोणकोणत्या शिक्षकांनी दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. याची माहिती सर्वच शाळांतील लिपिकांना माहिती आहे. त्यातील खरे दिव्यांग किती व बोगस दिव्यांग किती ही माहिती लिपिकांना आहे. शिक्षण विभागाने सर्वात अगोदर लिपिकांकडून माहिती घेऊन प्रमाणपत्रांची पडताळी करावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

### बोगस प्रमाणपत्र घेतले माघारी

दिव्यांग असल्याचे बोगस प्रमाणपत्राचा लाभ काही माध्यमिक शिक्षकांनी घेतलेला आहे. परंतु, आपण या प्रकरणावरून अडचणीत येऊ शकतो, अशी शक्यता वाटू लागल्याने काही शिक्षकांनी आपले दिव्यांगचे बोगस प्रमापत्र रद्द केलेले आहे. दिव्यांग असलेले शिक्षक आता धडधाकट झालेले आहे. अशा शिक्षकांची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

### त्यांच्यावर गुन्हे दाखल करा

काही शाळांमधील शिक्षक व लिपिकांनी संगमत करून बोगस प्रमाणपत्र सादर केलेले आहे. कारवाईच्या भीतीने त्या शिक्षकांनी ते प्रमाणपत्र लिपिकांमार्फतच माघारी घेतलेले आहे. असे असताना संबंधित शाळांमधील लिपिकांनी याची माहिती शिक्षण विभागाला देणे गरजेचे होते. परंतु, त्यांनी माहिती दिलेली नाही. त्यामुळे अशा शिक्षकांवर कारवाई करावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

**उद्याच्या अंकात : स्कूल बसच्या माध्यमातून पालकांची लूट**

## संमिश्र

### सीरियातील चर्चमध्ये आत्मघातकी हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**दमास्कस** : रविवारी रात्री सीरियाची राजधानी दमास्कसमध्ये झालेल्या भीषण आत्मघातकी हल्ल्यात किमान २२ जणांचा मृत्यू झाला आणि ६३ जण जखमी झाले. ग्रीक ऑर्थोडॉक्स सेंट इलियास चर्चमध्ये डझनभर लोक प्रार्थनेला उपस्थित असताना हा हल्ला झाला. इस्लामिक स्टेटशी संबंधित एका दहशतवाद्याने चर्चमध्ये घुसून प्रथम गोळीबार केला आणि नंतर स्वतःला उडवून दिले.

### अल्पवयीन मुलाकडून महिलेचा खून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चंद्रपूर** : चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा शहरात एक संतापजनक आणि धक्कादायक घटना घडली आहे. उधारीवर सिगारेट न दिल्याच्या रागातून एका महिलेचा खून करण्यात आल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, खून करणारा १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा असून तो पीडितेच्या शेजारील परिसरात राहतो. ही घटना राजुरा शहरातील रमाबाई नगरमध्ये १५ जून रोजी घडली.

### वडिलांची मारहाण, मुलीचा घेतला जीव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सांगली** : नीट परीक्षेत कमी मार्क मिळाल्याने शिक्षक असलेल्या बापाने पोटच्या मुलीला लाकडी खुंट्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीत या १७ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे. या घटनेने सांगलीच्या आटपाडी गावात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आरोपी वडिलांना पोलिसांनी अटक केली असून मुलीच्या आईने फिर्याद दिली होती.

### महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : भारतीय हवामान विभागाने आज आणि उद्या महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, तसेच पुणे-घाट, सातारा, कोल्हापूर आणि मराठवाडा व विदर्भ याठिकाणी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भ विभागात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ साठी आज आणि उद्या मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.



# कर्जत सहकारी दूध संस्थेवर प्रा. शिंदेंचे वर्चस्व

## दूध संघाची निवडणूक बिनविरोध; शिंदेंकडून नवनिर्वाचित संचालकांचा सन्मान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील सहकार महर्षी रावसाहेब उर्फ बाळासाहेब पाटील सहकारी दूध व्यवसायिक प्रक्रिया संघ मर्यादित या सहकारी संस्थेची निवडणूक बिनविरोध झाली. सभापती प्रा. शिंदे यांचे समर्थक १५ संचालक त्यावर निवडले गेले. या सहकारी संस्थेवर विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांचेच वर्चस्व राहील. हा सहकारी दूध संघ यापूर्वी देखील भारतीय जनता पक्षाच्याच ताब्यात होता.

सहकार महर्षी रावसाहेब उर्फ बाळासाहेब पाटील सहकारी दूध व्यवसायिक प्रक्रिया संघाच्या निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीपर्यंत एकूण १५ जागांसाठी १५ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. यामुळे निवडणूक अधिकारी यांनी सर्व संचालक बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सत्कार केला.

यावेळी संचालकांसह भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष अनिल गदादे व माजी तालुकाध्यक्ष डॉ. सुनील गावडे संपत बावडकर, विनोद दळवी, उपस्थित होते.

**दूध संघाचे नवनिर्वाचित संचालक**

मंगेश जगताप, काकासाहेब धांडे, दादासाहेब खराडे, शामराव काळे, बाळासाहेब निंबाळकर, अंकुशराव दळवी, रामजी पाटील, दत्तात्रय पाटील, शंकरराव देशमुख, दत्तात्रय तनपुरे, दादासाहेब निंबाळकर, शिवाजी काळे, बारकू काळे , शशिकला हनुमंत शेळके व छाया दीपक ढगे हे दूध संघाचे नवनिर्वाचित संचालक आहेत.

> दूध संघाचा कारभार लोकाभिमुख करा व सहकाराच्या तत्त्वाप्रमाणे सर्वांना बरोबर घेऊन संघाची प्रगती करा. तसेच दूध संघाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शासनाच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य करू.
>
> **– राम शिंदे,** विधानपरिषद सभापती

# डॉ. सुजय विखेंच्या प्रयत्नांतून बंद पाईप गटार कामाचा शुभारंभ

## भाजपाच्या माध्यमातून शहर विकासासाठी मोठा निधी आणला जाईल : अनिल मोहिते

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहर विकासाची नियोजनबद्ध कामे सुरू असून, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचे बारकाईने लक्ष आहे. आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात रस्ता काँक्रिटीकरण्याची कामे देखील सुरू आहेत. जमिनी अंतर्गतील विकासाची कामे आधी मार्गी लागणे गरजेचे आहे. माजी उपमहापौर मालनताई ढोणे व माजी नगरसेवक धनंजय जाधव यांनी नागरिकांचा विकास कामातून विश्वास संपादन केला आहे. भाजपाच्या माध्यमातून शहर विकासासाठी मोठा निधी



आणला जाईल, असे प्रतिपादन शहराध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून तेलीखुंट परिसरातील बंद पाईप गटार कामाचा शुभारंभ शहराध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी माजी उपमहापौर मालनताई ढोणे, माजी नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, यशवंत ढोणे, संजय ढोणे, अजय ढोणे, दिलीप लुंकड, दिलीप दारूरकर, रोहन धर्माधिकारी, अभय गुगळे, निखिल नहार, प्रताप परदेशी, प्रशांत मुथा, अनिल भोर, निलेश दारुलकर, प्रवीण ढोणे, ऋषिकेश ढोणे, विनोद गांधी, पियुष लुंकड, दीपक देहरेकर, निलेश दारुलकर, अविनाश घोलप, अंकित चिंतामणी, अक्षय आदमाने, सनी आदमाने, शुभम राऊत, सागर लोखंडे, विशाल कांबळे, अभिजीत ढोणे, अमोल ढोणे, शशांक ढोणे आदी उपस्थित होते.

माजी उपमहापौर मालन ढोणे म्हणाले की, तेलीखुंट परिसरातील ड्रेनेज लाईन चा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. मात्र मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करत तेलीखुंट परिसरातील ९०० व्यासाची बंद पाईप गटारीचे काम सुरू झाले आहे.

> प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्वजण काम करत आहोत. प्रभागातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला तेलीखुंट परिसरातील ड्रेनेज लाईनचा प्रश्न माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी सोडवला आहे. या कामासाठी माजी उपमहापौर मालन ताई ढोणे यांनी पाठपुरावा केला असून या कामाला सुरुवात देखील झाले आहे. पावसाळा आला की या परिसरातील व्यापारी अक्षरशा त्रस्त होत होती. आता अनेक वर्षाचा प्रश्न मार्गी लागत आहे.
>
> **– धनंजय जाधव, माजी नगरसेवक**

# भिमाबाई ठोकळ यांचे अल्पशा आजाराने निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्नगर :** कामरगाव येथील रहिवासी भिमाबाई अशोक ठोकळ (वय ९०) यांचे २१ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कामरगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी सरपंच अशोक ठोकळ यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सचिन ठोकळ, संतोष ठोकळ यांच्या त्या मातोश्री होत.

# नवनागापूरमध्ये योग दिन उत्साहात

## वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप आणि आरोग्य संदेश उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील नवनागापूर येथे जयहिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य व श्री साई सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्यपूर्ण जीवनासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे उपकार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले यांच्या प्रमुख उपस्थितीत योगासने आणि प्राणायाम करण्यात आले. कार्यक्रमाचे औचित्य साधून साई मंदिराच्या परिसरात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संगोपणाच्या समर्थनार्थ वृक्ष



**योगासनाचे धडे देत केले वृक्षारोपण**

आयुष मंत्रालयाच्या आदेशाने प्रत्येक मूल सुदृढ आणि निरोगी व्हावे या उद्देशाने जगभरात योग दिन उत्साहात साजरा केला जात आहे. तसेच वातावरणातील ऑक्सिजनची कमतरता भरून काढण्यासाठी आणि लहान मुलांमध्ये पर्यावरणाची संकल्पना रुजवण्यासाठी योगासनाचे धडे देऊन वृक्षारोपण केले आहे.

दिंडी काढून श्री साई मंदिरात योगासने आणि प्राणायाम केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व खाऊचे वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, सागर सप्रे, राहुल सप्रे, सुभाष दांगट, गोरख गव्हाणे, वडगाव गुप्ताचे सरपंच विजयराव शेवाळे, बाळासाहेब बडे, पार्थ शेवाळे, ज्ञानेश्वर आजबे, विपुल डोंगरे, सुयोग घोलप, बाळासाहेब चाबुकस्वार, ज्ञानदेव आडसुरे, अनिल सत्रे, सोन्याबापु शिंदे, नंदकुमार घुगे, लहू सुलाखे आदी उपस्थित होते.

# संगमनेर-पंढरपूर दिंडीत हजारो भाविकांची हजेरी

**माजी मंत्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे ११ वर्ष**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** वारकरी सेवाभावी मंडळ व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात वारकरी मंच आणि जय हिंद युवा मंच संचलित श्री सोमेश्वर पायी दिंडीचे दि. १९ जून २०२५ रोजी श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान झाले असून यात तालुक्तातील हजारो भाविक सहभागी झाले असल्याची



माहिती दिंडी संयोजक हभप जालिंदर ढोकरट यांनी दिली आहे.

हभप जालिंदर ढोकरट म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी सेवाभावी मंडळ, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात वारकरी मंच आणि जय हिंद युवा मंच संचलित सोमेश्वर पायी दिंडी सोहळ्याचे हे ११ वे वर्ष असून हि दिंडी श्री क्षेत्र पंढरपूरकडे निघाली आहे.

**संगमनेर तालुक्यातील गावे सहभागी**

दिंडीत संगमनेर, संगमनेर खुर्द, रायते, वाघापूर, राहणे मळा, ढोले मळा, सुकेवाडी, कासारवाडी मंगळापुर, खांडगाव, झोळे, गणेश वाडी, कोल्हेवाडी, निंबाळे, समनापुर कनोली, तळेगाव, वडझरी, हिवरगाव सावरगाव तळ आदी गावांसह तालुक्यातील वारकरी दरवर्षी सहभागी होत असतात.

सर्वजण विठ्ठलाच्या दर्शनासाठी आतुर असतात. या दिंडीच्या माध्यमातून एकत्र आलेले सर्व भाविक परस्परांशी बंधू भावाने वागतात. यातून एक वेगळीच अलौकिक अध्यात्मिक ऊर्जा मिळते.

ही दिंडी मार्गदर्शक अमृत महाराज जोशी, एस. झेड. देशमुख, वाळीबा महाराज भागवत, दिंडी संयोजक तथा अध्यक्ष जालिंदर ढोकरट, भाऊसाहेब मुंडे व माणिकराव पानगव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गक्रमण करीत आहे.

# चिमुकल्यांमध्ये योगाची सकारात्मक जागरूकता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सौंदाळा :** नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमात शाळेतील लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून विविध योगासने सादर केली.

कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक घुले व शिक्षकवृंद यांनी केले. विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, ताडासन, भुजंगासन, वज्रासन तसेच अनुलोम-विलोम यांसारखी योगासने सादर करत योगाच्या शारीरिक व मानसिक फायद्यांची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगताना शिक्षकांनी त्यांना दैनंदिन जीवनात योगाचा समावेश कसा करावा, याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या विशेष आकर्षणांपैकी एक म्हणजे विद्यार्थ्यांपुढे करण्यात आलेले प्रभावी योगप्रदर्शन. यामुळे लहानग्यांमध्ये योगाबाबत कुतूहल निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, समन्वयक डॉ. अतुल दरंदले आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकृष्ण हुरुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# ....अखेर आ. जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

## प्रेमदान हडको येथील नागरिकांच्या सोयीसाठी रेशन धान्य दुकान सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील महालक्ष्मी उद्यान, ताठे मळा येथील रेशन दुकानदाराच्या त्रासाला कंटाळून प्रेमदान हडको येथील नागरिक अक्षरशा त्रासले होते. तसेच नागरिकांना रेशनचे धान्य आणण्यासाठी सुमारे दीड किलोमीटर अंतर जावे लागत होते ही बाब आमदार संग्राम जगताप यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने महसूल विभागाशी संपर्क साधत पाठपुरावा केला, त्यामुळेच प्रेमदान




हडको येथे स्वतंत्र रेशन धान्य दुकान सुरू झाले असून आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश आल्याची माहिती राष्ट्रवादी ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर यांनी दिली.

प्रेमदान हडको येथे नवीन रेशन धान्य दुकान चा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी राष्ट्रवादी ओबीसी सेलचे सेल जिल्हाध्यक्ष अमित खामकर, विलास शिंदे, शिवजित डोके, सचिन जगताप, किरण पिसोरे, किसन गायकवाड, संतोष शिंदे, किरण निकम, शंकर जाधव, प्रसाद डोके, सर्जेराव ठोबरे, ईश्वर भोपळे, नंदकुमार मोरे, आप्पा खताडे, शंकर तुपे, गौरव जाधव, सुनीता वाल्हेकर, अंबिका भिसे, स्वाती पावळे, अल्का शिंदे, सचिन तुपे, संदीप थोरात, गोरख गव्हाणे, पद्माकर गवळी, अनिकेत येमुल, शुभम रासकर, अभिजित ढाकणे, सागर शहाणे, राहुल शहाणे आदी उपस्थित होते.

आ. जगताप म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असून त्या नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचे काम केले पाहिजे. या माध्यमातून लाभार्थ्यांना मदत होईल, प्रेमदान हडको येथील नागरिकांना रेशनचे धान्य आणण्यासाठी दुसऱ्या रेशन धान्य दुकानावर जावे लागत होते. हे अंतर लांब असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग यांना त्रासाला सामोरे जावे लागत होते.

> नागरिकांनी प्रेमदान हडको येथेच रेशन धान्य दुकान व्हावे, अशी मागणी केल्यानंतर तातडीने महसूल विभागाशी पाठपुरावा करून आज या भागातील नागरिकांना रेशनचे धान्य वाटण्याचे काम झाले आहे. हा प्रश्न मार्गी लागला असल्यामुळे या भागातील गोरगरीब महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मनाला समाधान लाभले आहे.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

# शिर्डी साईबाबा संस्थानमध्ये विशेष योग साधना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** जागतिक योग दिनानिमित्त श्री साईबाबा संस्थान व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने विशेष योग साधना कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ जून रोजी द्वारावती भक्तनिवास समोरील बागेत विशेष योग साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सामूहिक योगाभ्यास पार पडला.

योग प्रशिक्षण सत्राचे नेतृत्व योगाचार्य डॉ. तुषार सिसोदिया व डॉ. नचिकेत वर्पे यांनी केले. त्यांनी उपस्थितांना विविध योगासने



> निरोगी जीवनशैलीसाठी योग हे अत्यंत प्रभावी साधन असून, सद्यस्थितीत धकाधकीच्या जीवनात मानसिक व शारीरिक समतोल राखण्यासाठी योगाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.
>
> **– गोरक्ष गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी**

व प्राणायामाचे प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे प्रज्वल ढाकणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध योगासनांचे सादरीकरण करून उपस्थितांची योगप्रति जाणीव वाढवली.

योग मार्गदर्शकांचा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गाडीलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, उपकार्यकारी अभियंते दिनकर देसाई व संजय जोरी, शैक्षणिक संकुलांचे प्राचार्य, शिक्षकवृंद, विद्यार्थी, संस्थानचे अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांनो, परिसर अस्वच्छ होईल असे काम करू नका

## माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर; मनपा प्रभाग क्रमांक १ मध्ये स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मनपा प्रभाग क्रमांक १ मधील विकासाची कामे झपाट्याने मार्गी लागत आहे. सातत्याने स्वच्छ,सुंदर,हरित वार्ड करण्यासाठी प्रयत्न केले असून, त्याला यश येताना दिसत आहे. प्रभागाचा सर्वांगीण विकासाचा अजेंडा धरून वाटचाल केली. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे हाती घेतली.

त्यानुसार रस्ते, ड्रेनेज, लाईट, पाणी, स्वच्छता, ओपन स्पेस, सुशोभीकरण, वृक्षारोपण व संवर्धन कामे मार्गी लागली असल्यामुळेच प्रभाग क्रमांक १ हा विकास कामातून शहरात वेगळी ओळख निर्माण करेल,



भिस्तबाग महलच्या सुशोभीकरणाचे काम सुरू असून, जिल्ह्यातील पर्यटकांचे मनोरंजनाचे केंद्र बनल्याशिवाय राहणार नाही, स्वच्छता ही मनुष्याच्या जीवनातील महत्त्वाचा विषय आहे.

नागरिकांनी देखील स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होऊन आपण राहत असलेल्या परिसराची स्वच्छता ठेवावी. जेणेकरून मनुष्याचे आरोग्य सदृढ निरोगी राहण्यास मदत होईल.

त्यामुळे आपला परिसर अस्वच्छ होईल असे काम करू नका. असे प्रतिपादन माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी केले.

मनपा प्रभाग क्रमांक १ मध्ये माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांच्या पुढाकारातून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ संपन्न झाला. यावेळी माजी नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे, भैय्या चव्हाण, किसन कजबे, किसन नांगरे आदीसह नागरिक व महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, समाजामध्ये वावरत असताना नागरिक सर्वात जास्त प्लास्टिक वस्तूचा वापर करताना दिसत आहे. त्यामुळे आपल्या परिसरामध्ये सर्वत्र प्लॅस्टिक पसरलेले दिसते, त्यातून दुर्गंध पसरते. प्लास्टिक मुळे पर्यावरणाची हानी होत असते व नागरिकांच्या आरोग्यावर देखील परिणाम होतो.

> पूर्वी प्रभाग क्रमांक १ मध्ये रस्ते नसल्यामुळे महापालिकेचे कर्मचारी स्वच्छता करण्यासाठी येत नव्हते. आता मात्र सर्वत्र रस्त्यांची कामे पूर्ण होताना दिसत आहे या कामासाठी आमदार संग्राम जगताप यांचे मोठे सहकार्य लाभले आहे. प्रभागामध्ये विकासाची कामे होत आहे. हे माझे मत आहे. याबाबत लोकांचे काय मत आहे. हे लोकांनी मला सांगावे, महापालिकेचे सफाई कर्मचारी खऱ्या अर्थाने नगर शहर स्वच्छ ठेवण्याचे काम करत आहे.
>
> **– संपत बारस्कर, माजी विरोधी पक्षनेते**

# ‘ए-आय’ तंत्रज्ञानामुळे ऊस उत्पादन खर्चात बचत

## बिपीनदादा कोल्हे; आधुनिक तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी देशातील उस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीसाठी ४० वर्षापूर्वी शाश्वत उपक्रम राबविले, आज नव्या तंत्रज्ञानाची क्रांती येत आहे, ‘ए- आय’ तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऊस उत्पादन खर्चात ३० टक्के बचत होवुन उत्पादन सव्वा ते दीडपट वाढते. तेव्हा शेतकऱ्यांनी यात मोठया संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले.

बारामती कृषी विकास प्रतिष्ठान, कृषी विद्या विभाग ‘मॅप माय क्रॉप’ चे संचालक डॉ. भुषण गोसावी व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने सोमवारी कारखाना कार्यस्थळावर ‘ए- आय’ तंत्रज्ञान (कृत्रीम बुध्दीमत्ता) व ऊस उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

डॉ. भुषण गोसावी याबाबत मार्गदर्शन करतांना म्हणाले की, उपग्रह तंत्रज्ञानाच्या सहायांने बारामती कृषी प्रतिष्ठानने कृषक् अॅप विकसीत केले असुन त्याबाबत गेल्या चार वर्षापासून ऑक्सफर्ड विद्यापीठ, मायक्रोसॉफ्ट कंपनी संशोधन करत आहे. त्यातून वेगवेगळे निष्कर्ष काढले आहेत व त्याचा प्रत्यक्ष वापर ऊस शेतीत सुरू केला. शेतकऱ्यांचे प्रति एकरी उत्पादन वाढुन खर्चात मोठया प्रमाणांत बचत झाली आहे. पीक उत्पादन वाढीसाठी पाणी, खत, मशागत, आरोग्य व्यवस्थापन, पीकावरील कीड-रोग, माती पाणी पृथ्यकरण, जमिनीतील ओलावा आदी माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवुन त्यांना शाश्वत पीक उत्पादन मिळवुन देत आहे.




कोल्हे पुढे म्हणाले की, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी वसंतदादा शुगर इन्स्टीट्युटची स्थापना करून त्या माध्यमांतुन ऊस उत्पादन वाढीसाठी पुढाकार घेत सर्वप्रथम १९८४ मध्ये संजीवनीच्या कार्यक्षेत्रात ठिबक सिंचनाविषयी प्रभावी जनजागृती करून त्याचा प्रत्यक्ष वापर शेतीत केला होता. ऊस तज्ञ स्व. डॉ. ज्ञानदेवराव हापसे यांच्या मार्गदर्शनांखाली कार्यक्षेत्रातील उस उत्पादक शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन मेळावे घेवुन अत्याधुनिक तंत्रज्ञान सभासद शेतकऱ्यांच्या दारात पोहोचविले आहे. पोहेगावचे स्व. शामराव औताडे यांनी एकरी १०० मे. टनाच्या पुढे उसाचे उत्पादन घेवुन विक्रम केला होता. संजीवनीच्या कृषी संशोधन केंद्रात ६ हजाराच्या पुढे ऊस जाती विकसीत करून त्या देशभर पोहोचविल्या असल्याचे कोल्हे यांनी सांगितले. प्रारंभी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यकारी संचालक सुहास यादव प्रास्तविक केले. कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, सर्व संचालक, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे स्वागत केले. याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक उपस्थित होते.

# नगर-पुणे रेल्वे मार्गाला गती द्यावी

## खा. नीलेश लंके यांची रेल्वे विभागाच्या बैठकीत मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पुणे व सोलापूर रेल्वे मंडळांतर्गत संसदीय रेल्वे समितीची महत्त्वपूर्ण बैठक आज पुणे येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात (डीआरएम ऑफिस) पार पडली. या बैठकीत अहमदनगर (अहिल्यानगर) लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश ज्ञानदेव लंके यांनी आपल्या मतदारसंघातील दीर्घ प्रलंबित आणि जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांना तातडीने गती देण्याची ठाम भूमिका मांडली.



या बैठकीला संसद सदस्य म्हणून खासदार डॉ. सुप्रिया सुळे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार भाऊसाहेब वाघचौरे आणि खासदार विशाल पाटील यांनीही आपल्या-आपल्या मतदारसंघातील रेल्वे संदर्भातील गरजा व मागण्या मांडल्या.

तसेच मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीना, मुख्य वरीष्ठ संचालन अधिकारी श्याम सुंदर गुप्ता, मुख्य वाणिज्य व्यवस्थापक अरविंद मालखेडे, मुख्य अभियंता राजनीश माथूर, मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) अवनीश कुमार पांडे, पुणेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, सोलापूरचे डीआरएम डॉ. सुजीत मिश्रा, उपमहाव्यवस्थापक के. के. मिश्रा, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील निला यांच्यासह रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# देवळालीतून २०० भाविक पंढरपूरला रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा :** गावातील जेष्ठ नागरिक, वारकरी संप्रदायाच्या श्रद्धास्थान आणि कुटुंब उभारणीतील आदर्श स्त्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीमती सखुबाई एकनाथ वाळुंज यांच्या ९७ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या नातवाने व स्थानिक उद्योजक हरीश वाळुंज यांनी एक आगळावेगळा उपक्रम राबवत समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.




वाढदिवसाचे औचित्य साधत, गावातील तब्बल २०० महिला भाविकांना पंढरपूर येथे विठ्ठल-रखुमाई दर्शनाची मोफत यात्रा आयोजित करण्यात आली आहे. वाढदिवसानिमित्त केक, रोषणाई, गाजावाजा न करता सामाजिक उपयुक्ततेच्या कार्याला प्राधान्य देत साजरा होणारा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरत आहे. यावेळी महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते विधिवत वाहन पूजन संपन्न झाले. नामदेव महाराज शास्त्री, शिवाजीराव डौले, सचिन ढुस, अनंत कदम, डॉ.विश्वास पाटील, शैलेंद्र कदम, डॉ.संदीप मुसमाडे, राजेंद्र लोंढे, दीपक पठारे, महेश गडाख , कुमार कदम, सतिष होले, दत्तात्रय कदम आदी उपस्थित होते.

# वैजापूरमधील रुग्णांचा सुटला संयम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** ‘‘आजारी शरीर घेऊन उपचारासाठी रुग्णालयात पोहोचलेला रुग्ण, अपमानाचे घाव घेऊन बाहेर पडतात हे आरोग्यसेवेचे मंदिर आहे की उद्धट वागणुकीचा अखाडा?’’ असा संतप्त सवाल गंगापूर शहरातील नागरिक विचारू लागले आहेत. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, नर्स आणि ब्रदर यांच्या अरेरावीच्या वर्तनामुळे सामान्य माणसाची सहनशक्ती संपली असून, अखेर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे निवेदन देऊन थेट कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईकाना मोठा त्रास सहन करावा लागत असून यात गरीब कुटुंबातील शेतकरी, मजुर रुग्णालयात उपचार साठी दाखल होतात पण हीच सेवा रुग्णांच्या मनाला जखमा करत आहे.

डॉ. केंद्रे आणि काही नर्स व ब्रदर यांनी रुग्णांशी उद्धट, अवहेलनात्मक भाषा वापरल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. ‘‘रुग्ण हा माणूस आहे, तो एकटवाणा आहे, पण त्याच्याशीही कठोर शब्दांत बोलले जाते ही केवढी वेदनादायक बाब आहे!’’ असा सूर रुग्णांच्या नातेवाइकांमध्ये आहे.

संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत रिपाईचे तालुकाध्यक्ष बाबा भरपुरे व शहराध्यक्ष बापू खाजेकर यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुदाम लगास यांना निवेदन दिले. यात स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, ‘‘या मुजोर व उद्धट कर्मचाऱ्यांना तात्काळ समज द्या. नाहीतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अशा कर्मचाऱ्यांना काळे फासून निषेध करण्यास मागेपुढे पाहणार नाही.’’

# मोदींमुळे जगाला योगाचे महत्व समजले

## स्नेहलता कोल्हे; टाकळी येथे योगदिन उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** टाकळी (ता. कोपरगाव) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग ही भारताची अमूल्य देणगी असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण जगाला योगाचे महत्व पटवून देण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे. त्यांच्या प्रयत्नातूनच आज ‘जागतिक योग दिन’ संपूर्ण विश्वात साजरा होत आहे.




या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आ. स्नेहलता कोल्हे यांनी योगाच्या महत्त्वावर भाष्य करताना सांगितले की, योग ही एक जीवनशैली आहे. मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारताची सांस्कृतिक ओळख पुन्हा उभारली आहे. आपण प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार केला पाहिजे.

कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून योगाचे सत्र अनुभवले. प्रमुख उपस्थितांमध्ये संदीप देवकर (सरपंच, टाकळी), संजय देवकर (उपसरपंच), निलेश देवकर (सदस्य), रामदास देवकर सामाजिक कार्यकर्ते, अंबादास देवकर (टी.डी.बी चेअरमन), चंद्रकांत देवकर (२ नं. सोसायटी चेअरमन), सुनील देवकर (माजी सभापती पंचायत समिती), पुंडलिक देवकर (वी. चेअरमन) आदींचा समावेश होता.

# माश्यांमुळे निंबवी ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

## पोल्ट्री व्यवसाय स्थलांतरासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** श्रीगोंदा येथील निंबवी गावामध्ये ४०० मीटरच्या आत पोल्ट्री व्यवसाय सुरू आहे. यामुळे गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. हे पोल्ट्री व्यवसाय निंबवी गावातून बंद करून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माश्यांचे ताट घेऊन व झाडावर लागलेले माश्यां गळ्यात घालून उपोषण सुरू केले आहे.

या विषयाची अहवाल पंचायत समिती श्रीगोंदा यांच्याकडून प्राप्त झाला आहे. व्यवसायासाठी आवश्यक असणारे अनेक अधिकृत परवाने कंपनीला निंबवी ग्रामपंचायतने प्राप्त केलेले नसताना निंबोळी गावात रहिवासी वास्तव्यापासून ४०० मीटरच्या आत पोल्ट्री व्यवसाय चालू करून जाणीवपूर्वक मानवी आरोग्य धोकादायक परिस्थिती व प्रदूषित वातावरण तयार केलेल्या आहे. त्यामुळे सदर ही कंपनी त्वरित बंद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



आनंदा गावडे, अमोल गावडे, स्वप्निल लोखंडे, अशोक गावडे, भानुदास गावडे, दत्तात्रेय गावडे, विठोबा गावडे, बाळू गावडे, धोंडीबा गावडे, राहुल वाळके, मच्छिंद्र वनपुरे, राहीबाई गावडे, कविता गावडे, स्वाती गावडे, शारदा गावडे, शकुंतला शिर्के आदी उपोषणास बसले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले की, या कंपनीला कन्सल्ट परवाना निंबवी गावातील सातबारा उताऱ्यावर नाही जो गट नंबर आहे, तो अस्तित्वातही नाही असा अहवाल महसूल विभाग श्रीगोंदा यांच्याकडून प्राप्त झाला आहे. तसेच या कंपनीला व्यवसाय परवाना प्राप्त करून घेण्यासाठी निंबवी ग्रामपंचायत यांचे बनावट ना हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे.

# प्रवरा फार्मसीचा ९५.५५ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी लोणी अंतिम वर्ष पदविका अभ्यासक्रमातील चैताली राजेंद्र वाडेकर हिने ८६. ३६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, कोमल भास्कर गाढे ८६ (द्वितीय), संस्कृती विलास कोकणे ७९.९१ हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

द्वितीय वर्ष पदविका अभ्यास क्रमाचा निकाल ९५.५५ टक्के लागलेला आहे, अशी माहीती डॉ. रविंद्र जाधव यांनी दिली.

# पायी दिंडी सोहळ्यांचे ठिकठिकाणी स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान पायी दिंडी सोहळ्याचे सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते विधीवत पुजन करून प्रस्थान करण्यात आले. तसेच इच्छामनी कार्यालय या ठिकाणी राऊत परिवार यांचे वतीने स्वागत करण्यात आले. दिंडीतील भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



यावेळी शेखर राऊत व बाळासाहेब राऊत यांनी जंजाळे महाराज यांचा सन्मान केला. तसेच परिसरातील माऊली वृद्धाश्रम या ठिकाणी पायी दिडीं सोहळ्यांचे स्वागत करण्यात येऊन जंजाळे महाराज पायी दिंडी सोहळ्याचे संयोजक विनोद मलिक यांचा अध्यक्ष सुभाष वाघुंडे तसेच राजेंद्र देसाई यांनी सन्मान करत दिंडीतील भाविकांना केळी तसेच फराळाचे वाटप केले. यावेळी कल्पना वाघुंडे, मिनाक्षी देसाई, सविता देसाई, शुभम नामेकर, राजेंद्र रासने, दत्तात्रेय खिलारी, बन्सी शिंदे, पुंडलिक खैरनार, भानुदास महाराज खरात, सुभाष भालेराव आदी या दिंडी सोहळ्यासाठी प्रयत्नशील होते.

# शहर विकासाची कामे मार्गी लावण्याचे काम सुरू

## आ. संग्राम जगताप ; विशाल गणपती मंदिर रस्ता कॉँक्रिटीकरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, भाविकांच्या नवसाला पावणारे ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी भाविक वर्ग मोठ्या संख्येने देव-दर्शनासाठी येत असतात. त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी या परिसरातील रस्ता कॉँक्रिटीकरणाचे कामे हाती घेतले आहे. श्री. विशाल गणपतीच्या आशीर्वादाने मी शहर विकासाची कामे मार्गी लावत आहे, विश्वस्तांनी या कामांमध्ये अजून काही नवीन सुधारणा करायच्या असेल तर, करून घ्याव्यात जेणेकरून या परिसराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त होईल, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

अभय आगरकर म्हणाले की, महायुतीचे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरांमध्ये रस्त्यांची कामे मार्गी लागत आहे. श्री विशाल गणपती मंदिरावर त्यांची भक्ती, श्रद्धा असून ते नेहमीच मनोभावे पार्थना करत असतात. श्री.अष्टविनायक नंतर आपले ग्रामदैवत श्री. विशाल गणपती मंदिराचा नंबर लागत आहे. आ. संग्राम जगताप हे शहराचे आमदार असून त्यांना मंदिराबाबतचे काम सांगणे हे आमचे कर्तव्य आहे. ते नेहमीच मंदिराच्या विकासासाठी सहकार्य करत असतात असे ते म्हणाले.




आ. जगताप यांच्या प्रयत्नातून शहराचे ग्रामदैवत श्री. विशाल गणपती मंदिर परिसराचे रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी आ. संग्राम जगताप, देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, मा. सभापती अविनाश घुले, प्रा. माणिकराव विधाते, अशोक कानडे, सुरेश खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, मनेष साठे, नितीन पुंड, राजेंद्र कचरे, संभाजी पवार, सुहास पाथरकर, रंगनाथ फुलसौदर, विष्णू म्हस्के, बजरंग भुतारे, राजेंद्र कपाले आदी उपस्थित होते. आ. जगताप पुढे म्हणाले की, नागरिकांचे अनेक वर्षाचे शहर विकासाची स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. नियोजनबद्ध व कायमस्वरूपीची कामे मार्गे लागत असल्यामुळे समाधान मिळत आहे. केडगाव परिसरातील रस्त्यांची कामे मार्गी लागली आहे. आता शहरातील रस्त्यांची कामे मार्गी लागत आहे. या माध्यमातून समस्यामुक्त शहर निर्माण होऊन विकसित शहराची निर्मिती होईल. नगरकरांच्या सहकार्यातून ही सर्व कामे मार्गी लागत असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय

# दुर्मिळ खनिजांच्या पुरवठाबंदी निमित्त...

औद्योगिक तसेच इतर अनेक क्षेत्रांमध्ये मोलाची मानली जाणारी 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'च्या खाणकामात चीनचा वाटा सुमारे ७० टक्के आहे. उत्पादनात तो ९० टक्क्यांपर्यंत आहे. आजघडीला चीनच्या बंदरांवर अशा मॅग्नेट्सची बाहेरदेशी पाठवली जाणारी शिपमेंट थांबवण्यात आली आहेत. एकूणच चीनमध्ये मोठ्या प्रमाणात आढळणारी अशी खनिजे इतर देशांना न पाठवता चीन जागतिक पातळीवर रडीचा डाव खेळत आहे. ऑटोमोबाईल, सेमीकंडक्टर आणि एरोस्पेस व्यवसायासाठी हे साहित्य खूप महत्वाचे आहे. चीनने चार एप्रिल रोजी या सात मौल्यवान धातूंच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला होता. या आदेशानुसार हे मौल्यवान धातू आणि त्यापासून बनवलेले विशेष मॅग्नेट केवळ विशेष परवान्यासह चीनमधून बाहेर पाठवता येतील. कंपन्यांना चीनमधून मॅग्नेट आयात करण्यासाठी एंड-यूज सर्टिफिकेट द्यावे लागेल. यामध्ये हे मॅग्नेट लष्करी उद्देशांसाठी नाहीत, हे सांगावे लागेल. या हालचालीवरून खाण उद्योगातील चीनचे वर्चस्वदेखील दिसून येते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत सुरू असलेल्या 'टॅरिफ वॉर'मध्ये चीनकडून होणारा फायदा म्हणून याकडे पाहिले जात आहे. जगाचे 'पॉवर सेंटर' बनण्याच्या शर्यतीत चीन कधी सेमीकंडक्टरवर बंदी घालतो, तर कधी दुर्मिळ पृथ्वी धातूंच्या निर्यातीवर बंदी घालतो. चीनने घातलेल्या या बंदीमुळे अमेरिकेसह संपूर्ण जग अस्वस्थ झाले आहे. भारतही या बंदीपासून अस्पर्श राहिलेला नाही. 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'वरील या बंदीमुळे भारत आणि अमेरिकेसह जगातील वाहन उद्योग संकटात सापडला आहे. दुर्मिळ 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅगनेट्स'वर चीनची मक्तेदारी आहे. या मक्तेदारीमुळेच जणू चीनने पुरवठा थांबवला आहे. चीन हा या धातूचा सर्वात मोठा निर्यातदार आहे. 'रेअर अर्थ एलिमेंट्स' (आरईई) ही १७ रासायनिक खनिजे आहेत, जी इलेक्ट्रिक मोटर्स, वाहन इंजिन, बॅटरी आणि संरक्षण प्रणालींमध्ये वापरली जातात. मोबाईल फोन, संगणक आणि इलेक्ट्रिक वाहनांचे जीवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुर्मिळ मॅग्नेट्सवर चीनची मक्तेदारी आहे. 'ईव्ही' वाहनांमध्ये वापरली जाणारी ९० टक्के दुर्मिळ मॅग्नेट्स चीनमध्ये बनवली जातात.

चीनी मुस्कटदाबीमुळे उद्योगविश्वात अराजकतेची स्थिती निर्माण होऊ लागली आहे. याचा सर्वात वाईट परिणाम ऑटो उद्योगावर होईल. मॅग्नेट्सचे शुद्धीकरण चीनमध्ये होत असल्याने निर्यातीवर बंदी घालण्यात आल्याने जागतिक संकट निर्माण होईल. शस्त्रे बनवण्यापासून 'क्लीनटेक'पर्यंत अनेक उत्पादनांमध्ये या घटकांचा वापर केला जातो. चीनने या धातूंच्या खाणकाम आणि शुद्धीकरणासाठी एक धोरणात्मक उद्योग स्थापन केला आहे. त्यामुळे तो दुर्मिळ मॅग्नेट्सचा सर्वात मोठा पुरवठादार बनला आहे. अशा परिस्थितीत जगभरातील देश त्याच्या निर्यातीवरील बंदीमुळे हैराण झाले आहेत. चीनने निर्बंध कमी न केल्यास अनेक कारखाने बंद होऊ शकतात. गेल्या अनेक महिन्यांपासून चीन आणि अमेरिकेदरम्यान 'टॅरिफ वॉर' सुरू आहे. चीनने अमेरिका आणि जगातील इतर अनेक देशांना इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅगनेट्स'चा पुरवठा थांबवला होता. त्याच वेळी अमेरिकेने चीनला सेमीकंडक्टर डिझाइन सॉफ्टवेअर, रसायने आणि इतर तंत्रज्ञानाच्या वस्तूंची निर्यात थांबवली होती; परंतु आता चीन आणि अमेरिका यांच्यात मॅगनेट्सबाबत चर्चा सुरू झाली आहे. चीनने महत्वपूर्ण धातू देण्यास नकार दिल्याने जगभरातील देशांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन विस्कळीत झाले आहे. अमेरिका आणि चीनमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून परस्पर शुल्काबाबत तणाव पहायला मिळाला. त्यामुळे कोविड काळानंतर पहिल्यांदाच चीनची निर्यात ३४.५ टक्क्यांनी कमी झाली. दुसरीकडे, चीनने दुर्मिळ 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅगनेट्स'च्या पुरवठ्यावर बंदी घातल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी चर्चा केली आणि दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी जीनिव्हा बैठकीत झालेल्या सहमतीची अंमलबजावणी करण्यासाठी एक चौकट तयार करण्याचे मान्य केले. चर्चेत ठरले की दोन्ही देशांनी टॅरिफ संदर्भातले धोरण कायम ठेवावे आणि चीनने अमेरिकेला दुर्मिळ 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅगनेट्स'चा पुरवठा पुन्हा सुरू करावा. एखाद्या गोष्टीची मक्तेदारी झाली, की त्याचे दूरगामी परिणाम होतात. मक्तेदारीमुळे स्पर्धा संपते आणि लूट सुरू होते. अशा मक्तेदारीतून अडवणूकही होते. चीनने 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅगनेट्स'च्या निर्यातीवर बंदी घालून संपूर्ण जगाला धक्का दिला आहे. अमेरिकेने 'टॅरिफ वॉर' सुरू केल्यानंतर चीननेही अघोषित व्यापार युद्ध सुरू केले आहे. जागतिक निर्यातीत झालेले नुकसान आणि आपल्या देशामध्ये आलेल्या मंदीवर उपाययोजना करण्यासाठी चीन आता कोणत्याही थराला जायला लागला आहे. आपली मक्तेदारी असलेल्या आणि अवघ्या जगाला आवश्यक असलेल्या घटकांचा व्यापार अडचणीत आणून चीन जगाला आपल्यापुढे लोटांगण घालायला लावण्यास भाग पाडत आहे. चीनने घातलेल्या नव्या निर्बंधाचा फटका भारतीय वाहन उद्योगालाही बसला आहे. नजिकच्या भविष्यात चीनने निर्बंध कमी न केल्यास जगातील अनेक कारखाने बंद होऊ शकतात. या घटकांची जागतिक पुरवठा साखळी चीनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. वाहन उद्योगाला हे घटक निर्यात करण्याबाबत चीनने पूर्णपणे बंदी घातली नसली, तरी आता कंपन्यांना हे साहित्य चीनमधून बाहेर पाठवण्यापूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. यामुळे प्रक्रियेत अनिश्चितता आणि विलंब वाढेल. 'रेअर अर्थ एलिमेंट्स' आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'चा आर्थिक शस्त्र म्हणून वापर केल्याने चीनला अल्पकालीन फायदा होऊ शकतो; परंतु दीर्घकाळात ते धोकादायक ठरू शकते. अर्थात अशा धोरणांबाबत चीन बरेचदा बेपर्वा दिसतो. उद्योग असोत वा वैद्यकीय अडचणी, चीन कधीच मोकळ्या मनाने किंवा मानवतेला प्राधान्य देत धोरणे राबवताना दिसत नाही. आताही युध्दकाळाला अनेक देश सामोरे जात असताना चीन अशा प्रकारची कृत्रिम अडचण निर्माण करुन आपले महत्व वाढवू पहात आहे. यातून चुकीचे संदेश जातील. शिवाय प्रत्येक देश यापुढील काळात आपली जमेची बाजू असणाऱ्या घटकांचा वापर करुन उद्योगजगतात तसेच इतर क्षेत्रांमध्ये अडवणुकीचे धोरण अवलंबू शकतो.

# विकासाच्या वाटेवर अंतर्विरोध कायम

**नोंद**
भागा वरखडे, ज्येष्ठ पत्रकार



महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालचे सरकार सत्तेत येऊन सहा महिने झाले आहेत. या सरकारने एकीकडे पायाभूत विकासाच्या कामांना प्राधान्य दिले असताना दुसरीकडे सरकारची तिजोरी लाडक्या बहिणींमुळे रिकामी झाली आहे. विकास कामांच्या घोषणा भरपूर होतात; परंतु पैसा कुठून आणणार हा जसा प्रश्न आहे, तसाच सरकारमधील अंर्तविरोध ही सरकारपुढची मोठी समस्या ठरत आहे.

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या 'इकोसिस्टीम'मुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू आहे. पहिले रेल्वे स्टेशन बांधून तयार आहे. टोकियोमध्ये मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची चाचणी यशस्वी झाली आहे. पुढच्या वर्षी ही बुलेट ट्रेन भारतात येणार असली, तरी या ट्रेनने प्रवास करण्यासाठी आणखी तीन वर्षे वाट पहावी लागणार आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. पुण्यातही रिंगरोडसह अन्य कामे सुरू आहेत. मुंबईमध्ये सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकासकामांमुळे मुंबईमध्ये ५० अब्ज डॉलरपर्यंत गुंतवणूक होत आहे. नव्या मुंबईशेजारी तिसरी मुंबई उभी रहात आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणारे आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाचा विकास विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढवण्यात येत आहे. वाढवण बंदर हे जगातील पहिल्या दहा बंदरापैकी एक असेल. ते समृद्धी महामार्गाशी जोडले जाणार आहे. या परिसरात चौथी मुंबई वसवण्यात येणार आहे. दरम्यान, नागपूर ते गोवा 'शक्तिपीठ महामार्ग' निर्माण करण्यात येत आहे. मात्र हे घडत असताना दुसरीकडे सत्ताधाऱ्यांमध्ये अधिकारांसाठी रस्सीखेच होत असल्याच्या बातम्या सातत्याने येत आहेत.

राज्यात गुंतवणूकदारांना सोयीसुविधा मिळण्यासाठी तसेच वेगाने गुंतवणूक येण्यासाठी 'इज ऑफ डुईंग बिजनेस'मध्ये राज्य झेप घेत आहे. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून 'सिंगल विंडो सिस्टीम' कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना 'सिंगल विंडो' सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास महत्वाचे सहकार्य मिळत आहे. दळणवळणाच्या सोयीसुविधांच्या होणाऱ्या विकासामुळे राज्यात मालवाहतूक वेगाने करण्यात येत आहे. येत्या काळात मुंबईजवळील जवाहरलाल नेहरू बंदरापासून नागपूरपर्यंत आठ तासांमध्ये जाता येईल. वाढवण बंदरामुळे विकासाला नवा कोन प्राप्त होणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे. नवी मुंबईत नवीन 'एज्युसिटी' निर्माण करण्यात येत आहे. जगभरातील विविध नामांकित विद्यापीठे या परिसरात शैक्षणिक दालन उघडणार आहेत. त्यासोबतच हेल्थ सिटी, इनोवेशन सिटीचेही निर्माण करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक विश्वासार्ह स्थान म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. यंदा देशात आलेल्या ८१ अब्ज डॉलरच्या थेट विदेशी गुंतवणुकीपैकी एकट्या महाराष्ट्रात ३९ टक्के म्हणजेच सुमारे ३२ अब्ज डॉलर आले. याचा अर्थ असा की, भारतात गुंतवणूक करणाऱ्या प्रत्येक दहा डॉलरपैकी चार डॉलर हे महाराष्ट्रात गुंतवले गेले.

राज्यात विविध प्रकल्पांची कामे सुरू असताना आणि अनेक प्रकल्पांच्या घोषणा होत असताना सरकार पायाभूत कामे करणाऱ्या काही कंत्राटदारांचे पैसे मात्र देऊ शकलेले नाही. एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची बिले समोर असताना ठेकेदारांच्या हातावर लाखो रुपयांपैकी काही लाख रुपये ठेवून बोळवण केली जात आहे. त्यामुळे कंत्राटदारांनी अनेक कामे थांबवली आहेत. दुसरीकडे, लाडकी बहीण योजनेने सत्तेत येता आले; परंतु या योजनेचा सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा खर्च हे राज्यापुढचे मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय, आदिवासी विभागासह अन्य विभागांचा खर्च वळवला जात आहे. त्यातून महायुतीतच कलगीतुरा रंगला आहे. अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर शिवसेनेचे मंत्री तुटून पडले आहेत. महायुती सरकारकडून दलित आणि आदिवासी उपाययोजनांसाठी अर्थसंकल्पात ४० टक्के निधी वाढवून दिला खरा; पण वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या नावाखाली एका हाताने दिलेला निधी दुसऱ्या हाताने काढून घेतला जात आहे. 'लाडकी बहीण योजने'साठी या दोन्ही विभागांच्या निधीची पळवापळवी एकीकडे सुरू असताना दुसरीकडे लाडकी बहीण, बळीराजा वीज सवलत, घरकुल योजनेच्या नावाखाली सामाजिक न्याय विभागाच्या सहा हजार ७६५ कोटींवर वर्षभरात महायुतीकडून डल्ला मारला जाणार असल्याची शक्यता चर्चेत आहे. निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' महायुती सरकारच्या चांगलीच अंगलट आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजितदादांची पाठराखण करताना निधी वळवल्याचा आरोप करणाऱ्यांना अर्थसंकल्प नीट कळलेला नाही, अशी टीका केली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तीन मोठ्या पक्षांचे बहुमतातले महाविकास आघाडी सरकार कोसळण्यामागे एकनाथ शिंदे यांचे बंड कारणीभूत ठरले. त्यांनी ठाकरे यांची साथ सोडताना जी नाराजी, कुरघोडी, आरोप-प्रत्यारोप, निधीवाटपात भेदभाव असे एक ना अनेक आरोप केले होते. त्याचीच पुनरावृत्ती आता महायुती सरकारमध्ये होत आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुती सरकार पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेत आले आहे. या सरकारला विरोधी पक्षांकडून कुठलाही धक्का नसला, तरी अंतर्गत कलहाच्या वादळाची धास्ती कायम आहे. यामुळे दोन तलवारी एकाच म्यानात सांभाळणे फडणवीस यांच्यासाठी कसोटीचा काळ ठरणार आहे. महायुतीमध्ये भाजप सर्वाधिक जागांसह मोठा भाऊ म्हणून मिरवत असला तरी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेकडूनही आपापल्या पक्षाच्या विस्तारासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. पक्षविस्तार करताना हे तीनही पक्ष विरोधकांचे पक्ष आणि त्यांचे नेते फोडण्याऐवजी मित्रपक्षांचेच नेते गळाला लावत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अपवाद वगळता महायुती सर्वत्र एकत्र येऊन लढणार असल्याचे नेते सांगत असले, तरी कार्यकर्ते मात्र स्वबळाचा आग्रह धरत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेमध्ये स्वबळाची चाचपणी सुरू आहे. महायुतीमध्ये पहिल्यांदा खातेवाटप, मंत्रिपदे, पालकमंत्रिपदांवरून नाराजीनाट्य रंगले. पालकमंत्रिपदाचा घोळ तर सरकारला सत्तेत येऊन सहा महिने उलटले तरी सोडवता आलेला नाही.यातच आधी दबक्या आवाजात बोलली जाणारी निधीवाटपात मिळत असलेली सापत्नपणाची वागणूक आता शिवसेनेच्या मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोरच चर्चेला आणली. महायुतीमध्ये अजित पवार नकोत, ही भूमिका शिवसेनेच्या नेत्यांनी आजपर्यंत वारंवार बोलून दाखवली. आता त्याची धग थेट रायगडपर्यंत पोहोचली. फडणवीस, शिंदे, पवार या प्रमुख नेत्यांनी सरकार आणि महायुती मजबूत असल्याचे अनेकदा ठणकावून सांगितले आहे; पण त्यांच्याकडून आपापले मंत्री, नेते, पदाधिकारी, आणि कार्यकर्त्यांना आवर घालण्यासाठी त्या त्या पातळीवर प्रयत्न केले गेल्याचे दिसून आलेले नाही. फडणवीस यांच्या सरकारमध्ये सध्या सहा राज्यमंत्री आहेत; मात्र त्यापैकी फक्त एका राज्यमंत्र्याला निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. उर्वरित पाच मंत्र्यांना अद्याप मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे मंत्रालयात आले, तरी या मंत्र्यांकडे कोणतेही काम नसते. तीन राज्यमंत्र्यांनी याबाबत फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यांच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री निर्णय घेतात, तेव्हा या राज्य मंत्र्यांना माहिती दिली जात नाही. परिणामी, विधानमंडळाच्या अधिवेशनात सदस्यांकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तर देताना अडचणींचा सामना करावा लागतो. कोणतीही फाईल राज्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवली जात नाही. काही मंत्र्यांना अद्यापही पुरेसा कर्मचारी वर्ग मिळालेला नाही. त्यामुळे दैनंदिन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस सरकारमधील अंतर्विरोधाने त्यांच्या कामाचा झपाटा झाकोळला जात आहे.

# माजी मंत्री पाचपुतेंमुळेच नळ योजनेला निधी

## श्रीगोंदा शहरातील वाड्यावस्त्यांना ३८ कोटींच्या नळ योजनेच्या कामास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरात असणाऱ्या वाड्यांना व वस्त्यांना सुमारे ३८ कोटी रुपये खर्च करून नवीन नळ योजना करण्यात येत आहे. माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी सतत केलेल्या प्रयत्नांमुळे अन् नूतन आ. विक्रमसिंह पाचपुते यांच्या पाठपुराव्याने या योजनेस निधी मिळून या कामास नुकताच प्रारंभ झाला आहे.

या नवीन नळ योजनेतून शहराच्या आसपास असणाऱ्या जवळपास सर्वच वाड्या व वस्त्यांना पुरेशा दाबाने व मुबलक प्रमाणात पाणी ऊपलब्ध होणार आहे. ही बहुउद्देशीय योजना पाचपुते यांच्या अथक प्रयत्नांचे फळ आहे. घोड धरणावरून श्रीगोंदा शहराला सध्या पाणीपुरवठा होत असलेली मुख्य योजना ही देखील पाचपुते यांच्या अनेक वर्षे केलेल्या पराकाष्ठेमुळे शक्य झाली आहे. मूळ योजनेत घोड धरणाच्या मृत साठ्यातून पाणी उपसा करण्यात येत आहे. त्याचा फायदा असा

श्रीगोंदा शहरातील विस्तार व वाढते नागरीकरण विचारात घेऊन भविष्यातील अनेक पिढ्या या योजनेच्या लाभार्थी असतील. आगामी काळातील पाण्याची गरज लक्षात घेऊन हे नियोजन केलेले आहे.पाणी टंचाई हा शब्द इतिहासजमा करण्याचे काम या योजनेद्वारे होत आहे.श्रीगोंदा शहर हे दुष्काळात पाणी टंचाईचे शहर म्हणून ओळखले जात.आता पाण्याची सुबत्ता असणारे शहर म्हणून त्याची नोंद इतिहासात होईल.यासाठी आपण सतत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करीत होतो.त्यातून हे यश साध्य झाले.

**– विक्रमसिंह पाचपुते, आमदार**



की भविष्यात प्रतिकूल निसर्ग किंवा दुष्काळामुळे घोडचा अचल पाणीसाठा संपला तरी मृत साठ्यातील पाणी वापरता येते.

मृतसाठ्यातील क्षमतेचा विचार करता दुर्दैवाने जर तीन वर्षे जरी घोड भरले नाही तरी शहराला पाण्याची अडचण भासणार नाही. मुख्य योजनेतून शहराला नित्य पुरवठा होत असताना आसपासच्या वाड्यावस्त्या करिता पूर्ण दाबाने पाणी मिळावे. यासाठी पाचपुते यांनी शासन दरबारी प्रयत्न केले. त्यामुळे सरकारने ३८ कोटी रुपये योजनेसाठी दिले. त्याचे टेंडर होऊन कार्यारंभ आदेश देण्यात आला. कामास सुरवात देखील झाली आहे. नव्या योजनेत आनंदकर मळा येथे साडे सात लाख लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात येत आहे.

श्रीगोंद्याचे सरपंच असलेले स्व. कांतिलाल भंडारी यांच्या समवेत राज्य सरकारकडे जाऊन पाठपुरावा करणाऱ्या शिष्ठमंडळात पाचपुते स्वतः होते. तेव्हाच्या मंत्री अन् सरकारी अधिकाऱ्यांना पाचपुते यांनी ही योजना किती आवश्यक आहे. हे पटवून दिल्याची आठवण स्वतः पाचपुते यांनी शहरातील जुन्या पिढीतील नागरिकांशी बोलताना सांगितली. विशेष म्हणजे तेव्हा पाचपुते यांचा राजकारणात नुकताच श्री गणेशा झाला होता.

# अळसुंदे विद्यालयात विविध उपक्रमांनी योगा साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : रयत शिक्षण संस्थेच्या कर्जत तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल अळसुंदे विद्यालयात केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या सूचनेनुसार आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये गावातील वयोवृद्ध, नागरिक सहभागी झाले होते.



विद्यालयाचे मुख्याध्यापक व योग प्रशिक्षक रामदास परहर यांनी योग दिन साजरा करण्यामागील पार्श्वभूमी व मानवी जीवनातील योगाचे महत्त्व पटवून सांगितले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रार्थना, प्रारंभिक कृती, योगासने प्राणायाम व मेडिटेशन आदी क्रियांचे प्रात्यक्षिक सांस्कृतिक विभाग प्रमुख सुनील गोरखे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत विद्यार्थ्यांनी उत्साहात सादर केल्या.

समाजातील गरजू व्यक्तींना निरामय आरोग्यासाठी मॉर्निंग कार्डियाक वर्कआउट व सकस संतुलित आहार विषयक मार्गदर्शन करणारे विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक व आरोग्य सल्लागार सुनील गोरखे यांनी उत्साह पूर्ण वातावरणात वर्कआउट व्यायाम प्रकार सादर केले आणि विद्यार्थ्यांनी आनंदाने वर्कआउट करून आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा वर्कआउट हा भाग करण्याचे आश्वासन दिले. या नावीन्यपूर्ण उपक्रमात सहभाग घेऊन रवींद्र विधाते, महेश सप्रे, मोहिनी केदार, सुरेशकुमार देशमुख व नितीन जगताप यांनी मार्गदर्शन केले.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## दिव्यांगांना साहित्य वाटपात नगर जिल्हा अव्वल

प्रशांत गायकवाड, नंदकुमार फुले, कमलेश यादव, डॉ. अभिजित मेरेकर, डॉ. दीपक अनाप, आदिनाथ ढाकणे, सरपंच सुलोचना ढेपले, उपसरपंच विवेक परजणे, तसेच विखे पाटील हॉस्पिटल, ऍलिमको, संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्र व जिल्हा दिव्यांग केंद्राचे सर्व अधिकारी, लाभार्थी उपस्थित होते. यावेळी राजेश परजणे यांच्या संकल्पनेतून संवत्सर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील २१ विद्यार्थिनींचा सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत पहिला हप्ता भरण्यात आला. तसेच नामदेवराव परजणे पाटील महाविद्यालयातील विज्ञान शाखेतून कोमल अरुण कानडी हिने (७१.१७) टक्के, वाणिज्य शाखेतील वैशाली कचेश्वर खिलारी व पठाण परवेज इसरारखान (६९.३३), कला शाखेतील पायल संजय खटकाळे (७१.१७) या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विखे पाटील म्हणाले, सर्वसामान्य माणूस आयुष्यभर कष्ट करतो. वयाच्या साठ वर्षानंतर त्यांचे जीवनमान कसं असेल, आर्थिक परिस्थितीमुळे सहाय्यक साधने घेणे शक्य होत नसेल, याचा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बारकाईने विचार करून ही योजना आणली आहे आणि आज याच योजनेच्या माध्यमातून देशभरात मोठे काम होत आहे. विविध योजना राबविण्यासाठी देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सतत प्रयत्न सुरू राहतील. उपसरपंच विवेक परजणे म्हणाले, विखे पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून वैद्यकीय उपचाराची मदत असेल, संवत्सर येथे सुरू असलेल्या नवीन ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती असेल, उभारण्यात आलेल्या नामदेवराव परजणे पाटील महाविद्यालयाच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य असेल, वयोश्री योजना दिव्यांग योजनेतून गरजवंतांना साहित्य वाटप असेल यासाठी कोपरगाव तालुक्यावर विखे पाटील परिवाराचे नेहमी सहकार्य राहिले आहे. आणि त्याच माध्यमातून या योजनेअंतर्गत एका व्यक्तीला बारा हजार रुपयांपर्यंतची साहित्यांची मदत करता येते. त्या माध्यमातून संवत्सर परिसरातील २१० लाभार्थ्यांना एकूण ११५५ साहित्यांचे वाटप करण्यात आले. त्यांची एकूण किंमत १६ लाख ३४ हजार २२८ रुपये इतकी आहे. यापूर्वी २०२३ मध्ये ७९ दिव्यांग लाभार्थ्यांना साडेपाच लाख रुपयांचे साहित्याचे नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले आहे. दिव्यांग बांधवांसाठी युडीआयडी कार्ड महत्त्वपूर्ण आहे. ते काढण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी एकच वार असतो. एकच दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होते त्याचबरोबर काहींना तेथे जाणे शक्य होत नाही. त्यामुळे दिव्यांग बांधवांची गैरसोय लक्षात घेता. आपल्या माध्यमातून संवत्सर येथे कॅम्प घेण्याची परवानगी मिळून द्यावी असेही परजणे यावेळी म्हणाले. आभार प्रदर्शनाप्रसंगी राजेश परजणे म्हणाले, देशात दिव्यांग व वयोश्री योजनेच्या माध्यमातून सर्वाधिक लाभ मिळवून देण्यासाठी डॉ. सुजय विखे यांचा प्रथम क्रमांक राहिला आहे. सुजय विखे यांच्या माध्यमातून विखे परिवाराची चौथी पिढी ही जनसेवेसाठी यशस्वीरित्या काम करत आहे. यातूनच जनतेचे विखे परिवारावर किती प्रेम आहे हे लक्षात येते. खासदारकीच्या पराभवानंतर अवघ्या काही दिवसातच पुनश्च एकदा कामाला लागून सुजयवर जनतेचे असलेले प्रेम जनतेने दाखवून दिले आहे. दरम्यान या कॅम्पसाठी डॉ. अभिजित दिवटे यांचे विशेष सहकार्य लाभले. वयोश्री योजनेच्या माध्यमातून श्रवणयंत्र, मानेचा पट्टा, कमोड चेअर, वॉकर, गुडघ्याचा पट्टा, पाठीचा पट्टा, सिलिकॉन कुशन, पाठीचा आधार पट्टा, तीन व चार पायाची काठी, साधी काठी, ॲडजेस्टेबल काठी, शीटसहित काठी, व्हीलचेअर, कमोड व्हीलचेअर तसेच दिव्यांग योजनेच्या माध्यमातून बॅटरी चलीत तीन चाकी सायकल, श्रवणयंत्र, तीन चाकी सायकल, ब्रेल किट, व्हीलचेअर मोठी, व्हीलचेअर या सहाय्यक साधनांचे वाटप करण्यात आले.

## अध्यात्मिक वारसा अखंड सुरू ठेवा

अध्यात्मिक वारसा अखंड सुरू राहावा, हीच विठुरायाच्या चरणी प्रार्थना करत असल्याचे ते म्हणाले. वर्षभरासाठी प्रेरणा आणि ऊर्जा देणाऱ्या या दिंडी सोहळ्याच्या आयोजनामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक चेतना एकत्रितपणे व्यक्त होत असल्याचे यावेळी पाहायला मिळाले.

## जनावरे चारण्यासाठी विहिरीत बुडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

पथकाने विहीरीत गळ टाकून सुशांतचा मृतदेह बाहेर काढला. सुमारे एक तास हे रेस्क्यू सुरू होते. सुशांचा मृतदेह विहीरतून बाहेर काढल्यानंतर मात्र भवार कुटुंबियासह उपस्थित अनेक महिला भगिनींना अश्रु अनावर झाले. यावेळी मंडल अधिकारी सीमा देठे, तलाठी अमोल कचरे यांच्यासह करंजीचे पोलीस, महावितरणचे कर्मचारी देखील मदतीसाठी उपस्थित होते. पाथर्डी येथे शवविच्छेदन झाल्यानंतर सुशांत भवारचा मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला.

## ...आता पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात थोरातांचे जीवनकार्य

करणाऱ्या राज्यातील दिग्गज नेतृत्वाचा समावेश असून सहकारात आदर्श तत्व व विचार देणारे स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जीवन कार्याचा समावेश करण्यात आला आहे. याचबरोबर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मा. कृषी व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणारा व देशासाठी आदर्शवत असणारा संगमनेर येथील अमृत उद्योग समूहातील सहकार याचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला असल्याचे माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांनी म्हटले आहे

## कृषी पतसंस्था सभासदांना कर्ज देणार

काळात देखील संचालकाने करताना तो पारदर्शक राहील, याची देखील काळजी घ्यावी, असे राम शिंदे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेची चेअरमन संतोष सुरवसे यांनी संस्थेचा सर्व लेखाजोखा व ताळेबंद सभासदांच्या समोर मांडला. संस्थेच्या वतीने १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी व सेवा निवृत्त सभासद यांचा सत्कार ना. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा मोहीम अंतर्गत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी राज्यात प्रथम क्रमांक मिळवल्याने व तालुका कृषी अधिकारी कोपरगाव यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवल्याने राम शिंदे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी कृषी संचालक कृषी आयुक्तालय पुणे, रफिक नाईकवाडी, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांची भाषणे झाली. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन संजय मेत्रे यांनी केले. आभार व्हा. चेअरमन अल्ताफ शेख यांनी केले.

# ग्रामीण रुग्णालयाच्या विस्तारीत इमारतीचे काम वेळेत पुर्ण करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : ग्रामीण रुग्णालयाच्या विस्तारीत इमारतीचे काम निर्धारित वेळेत पुर्ण करुन, आरोग्य सेवा सक्षम आणि दर्जेदारपणे मिळावी, या दृष्टीनेच सर्व सुविधांची उभारणी करण्याच्या सुचना डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या. जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या माध्यमातून राहाता येथील ग्रामीण रुग्णालयाच्या विस्तारीत इमारतीचे काम तसेच आधिकारी, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या नियोजित जागेची पाहाणी डॉ. विखे पाटील यांनी सार्वजनिक



बांधकाम आणि आरोग्य विभागाच्या आधिकाऱ्यांसमवेत केली.

याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास वर्पे, आरोग्य आधिकारी डॉ. गोकूळ घोगरे, राहाता नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे यांच्यासह अन्य आधिकारी उपस्थित होते. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आधिकाऱ्यां समवेत विस्तारीत ग्रामीण रुग्णालयाच्या

डॉ. सुजय विखे पाटील यांनी श्री. साईराजा अमृतेश्वर भव्य पायी दिंडी सोहळ्याचे स्वागत करुन पंढरपुरकडे निघालेल्या वारक-यांना शुभेच्छा दिल्या. शिर्डी मतदार संघातील नादुर्खी, साकुरी, तरकसवाडी, पिंप्री निर्मळ आदि गावांमधून निघालेल्या पायी दिंडी सोहळ्यात ते काही काळ सहभागी झाले.

कामाचा आढावा घेतला.

तसेच ग्रामीण रुग्णालयात सध्या सुरु असलेल्या कामाची पाहाणीही केली. ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य माणसांचा विचार करुन, आवश्यक असलेल्या सर्व सुविधांची उभारणी करुन घ्यावी. कामात कोणत्याही तृटी राहू नयेत, सर्व कामे दर्जेदार व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण रुग्णालय हे सामान्य माणसाला आपले वाटले पाहीजे. या रुग्णालयातून मिळणारी आरोग्य सेवा तत्पर असावी, यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात.

यासाठी अधिकचा निधी लागल्यास ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# दिघेवस्ती शाळेत नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव** : उन्हाळी सुट्ट्यानंतर १६ जून पासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. शाळेच्या पहिल्याच दिवशी आदर्श उपक्रमशील व गुणवत्तेसाठी ओळखली जाणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघेवस्ती (धानोरे) येथे नव्याने दाखल होणाऱ्या पहिलीतील विद्यार्थ्यांची आकर्षक सजवलेल्या तीन बैलगाडींतून वाजत-गाजत, नृत्य करणारा अश्व तसेच सनईच्या मंगल सुरात मिरवणूक काढून तसेच गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेत प्रथमच दाखल होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शाळ-चे महत्त्व पटवून देताना अभ्यासाबरोबरच नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. शाळा प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षाकडे त्यांनी उत्साहाने पहिले पाऊल टाकले आहे.

शाळेच्या प्रवेशद्वारावर उपस्थित विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षक यांनी त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला. पालकही या सोहळ्यात उत्साहाने सहभागी झाले आणि आपल्या मुलांचा हा खास दिवस संस्मरणीय बनवला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती, सांस्कृतिक समिती, माता- पालक समिती, शिक्षक-पालक समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष शाळेतील मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे, राजेंद्र बोकंद, श्रीम. विद्याताई उदावंत, सुनिता ताजणे, मनिषा शिंदे व सोमनाथ अनाप आदींनी परिश्रम घेतले.

# प्रवरा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा रूरल अभियांत्रिकी महाविद्यालय येथील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी २०२५ च्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये उत्तम यश संपादन केले असून १०० टक्के विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नाने विभागातील विद्यार्थ्यांकरता करिअर घडवण्याच्या दृष्टीने एकूण १८ कंपन्याद्वारे चतुर्थ वर्षात शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या.



## विद्यार्थ्यांना संवाद कौशल्याचे ज्ञान

दर्जेदार शिक्षणाबरोबरच प्लेसमेंटसाठी विद्यार्थी तयार व्हावा, या दृष्टीने विशेष प्रयत्न हे महाविद्यालयाच्या माध्यमातून केले जातात. यासाठी विकसित नवनवीन तंत्रज्ञान, संवाद कौशल्य, प्रक्षेत्र भेटी, औद्योगिक क्षेत्रात होत असलेले नवनवीन बद्दल, औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणारे तंत्रज्ञान देण्याबरोबरच विद्यार्थ्यांना संवाद कौशल्याच्या माध्यमातून तयार केले जाते, अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. अण्णासाहेब वराडे यांनी दिली.

या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी, तांत्रिक चाचणी, आणि शेवटी एच. आर. इंटरव्यू घेऊन जवळपास सर्वच विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांना सरासरी साडेतीन लाखापासून ते कमाल पावणे लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने तृप्ती जोशी वरली इंडिया मुंबई व शुभजीत म्हस्के आणि तेजस तांबे टोयो इंजिनिअरिंग मुंबई येथे सर्वात जास्त वार्षिक पॅकेज मिळण्यात यशस्वी झाले आहे. या सर्वच विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट होण्यासाठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मिलिंद म्हस्के,प्लेसमेंट समन्वयक प्रा.मोसिन शेख ,माजी विद्यार्थी समन्वयक प्रा. श्रीपाद निंबाळकर तसेच प्रा. मनोज परजने, प्रा. संजय बेलकर, प्रा. राजेंद्र निंबाळकर पॉलिटेक्निक कॉलेज यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भगवती माता विद्यालयास दिले पंखे

## सुजय दादा विखे पाटील युवा मंचचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : सुजय दादा विखे पाटील युवा मंचच्या वतीने भगवती माता विद्या मंदिर या विद्यालयास ९ फॅन व १० एलएडी ट्यूब भेट म्हणून दिल्या. सदर उपक्रमात नितीन कुंकुलोळ, अक्षय मोरे, विनीत हिरानंदानी, गौरव गलांडे, सौरभ रांका आदी मान्यवरांनी स्वखर्चातून सदर साहित्य विद्यालयाला दिले. याप्रसंगी स्कूल कमिटीचे अध्यक्ष संभाजीराव देवकर, दिलीप शेळके, पंढरीनाथ खर्डे ,



भरत खर्डे, सुजित खळदकर, आशुतोष बोरसे, सचिन राऊत यांच्या हस्ते सदर साहित्य भगवती माता विद्या मंदिर च्या प्राचार्या श्रीमती अडेप, शिक्षकवृंद व सर्व सेवकांच्या उपस्थितीत देण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने सचिन कडसकर यांनी स्वागत केले तर प्राचार्या अडेप यांनी आभार मानले. या प्रसंगी सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पंचगंगाच्यावतीने वारकऱ्यांना फराळाचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : संभाजीनगर - अहिल्यानगर हायवेवरील माळीचिंचोरा फाट्यावर पंचगंगा उद्योग समूहाच्या वतीने श्री क्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांतील वारकऱ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. दरम्यान विधानपरिषदेचे सभापती ना. राम शिंदे यांनीही यावेळी भेट दिली असता त्यांचा पंचगंगा उद्योग व भाजपच्या वतीने सत्कार करण्यात आला. सध्या पंढरपूरकडे अनेक दिंड्यांचे प्रस्थान झालेले आहे. या दिंड्यांतील वारकऱ्यांना पंचगंगा उद्योग समूहाच्या वतीने पंचगंगाचे सर्वेसर्वा प्रभाकर शिंदे यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, डॉ. अविनाश काळे आदि मान्यवर उपस्थित होते. डॉ. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांचे मोफत तपासणी शिबीर घेण्यात येत आहे. यावेळी सतीश कर्डिले अशोक टेकने, संदीप आदमने , राजेंद्र कदू ,विकास गायकवाड, बाळासाहेब चिंधे, मनोज पारखे, बाळासाहेब क्षीरसागर, कारभारी उदागे, बाळासाहेब पिसाळ, बंटी दिघे आदि उपस्थित होते.

# दिंडीच्या मुक्कामी ठिकाणी वृक्षारोपण

## अनुस्पर्श फाउंडेशनचा पर्यावरणपूरक उपक्रम सुरू



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर हजारो भाविक पंढरपूरच्या दिशेने पायी वारी करत आहेत. भक्ती, उत्साह आणि श्रद्धेने भारलेल्या या वारीमध्ये यंदा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा एक आगळा उपक्रम राबवण्यात येत आहे. तालुक्यातील जाटदेवळे येथील 'अनुस्पर्श फाउंडेशन' या सामाजिक संस्थेच्या वतीने विविध पायी दिंड्यांच्या मुक्कामी वृक्षारोपण करण्यात येत असून, समाजात पर्यावरणपूरक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या उपक्रमाची संकल्पना फाउंडेशनचे सचिव डॉ. उध्दव घोशीर यांनी मांडली असून, ''ज्या ठिकाणी दिंडीचा मुक्काम आहे, त्या ठिकाणी स्थानिक नागरिक, सरपंच आणि भाविक यांच्या उपस्थितीत एक झाड लावण्यात येईल,'' असे त्यांनी सांगितले. प्रत्येक झाडासाठी कुंपणाचीही व्यवस्था करून त्याचे संरक्षण सुनिश्चित करण्यात येत आहे. लावले जाणारे झाड 'केशर आंबा' जातीचे असून, स्थानिक कुटुंबांना त्याच्या संगोपनाची जबाबदारी दिली जाते.

या उपक्रमाची सुरुवात सुदर्शन गड शिंदेवाडी येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या दिंडीपासून झाली. प्रस्थानपूर्वी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात अनेक मान्यवर सहभागी झाले होते. ''धार्मिक कार्यातून जर पर्यावरणाचा संदेश दिला गेला, तर तो लोकांच्या मनात लवकर रुजतो,'' असा विश्वास सुदर्शन मुनी महाराज उदासीन असे म्हणाले. यावेळी ऋषी महाराज तांगडे, सुदाम महाराज पवार, डॉ. उध्दव घोशीर, बाबासाहेब झरांडे, उध्दव आठरे उपस्थित होते.

# उद्धव महाराज मंडलिक यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नेवासा** : महाराष्ट्र वारकरी कीर्तनकारांच्या परिषदेचे आळंदी येथे रविवारी आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या सुकाणू समितीवर लोणी, राहता येथील वरद विनायक सेवाधामचे महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांची निवड करण्यात आली आहे. वारकरी संप्रदायातील संभाव्य कृतिशील उपाययोजनांसाठी महाराष्ट्रातील एकूण बारा कीर्तनकारांची समिती स्थापण्यात आली आहे. त्यात नेवासा येथील महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांचा समावेश आहे. वारकरी सांप्रदायाची २१ व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप, समस्या, आव्हाने व निराकरण व संभाव्य कृतिशील उपाययोजनांसाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (पुणे)च्या वतीने कीर्तनकार परिषदेच्या समितीवर महाराष्ट्रातील १२ कीर्तनकारांची सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. नेवासा बुद्रुक शिवारात असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंतउद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांची या समितीवर निवड करण्यात आली असल्याची माहिती एमआयटी शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ.राहुल कराड यांनी पत्राद्वारे दिली.

# कृषीदुतांनी दिले योगाचे धडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा** : आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सोनई येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी म्हसले जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत योग दिनाचे आयोजन करून शिस्तबद्ध पद्धतीने चिमुकल्यांना योगा व प्राणायमचे धडे देत योग दिन मोठया साजरा केला. ग्रामीण भागात योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी या उपक्रमाचे कृषीदुतांनी या योग दिनानिमित्त या शाळेची निवड केली होती. योगा व प्राणायमास सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने केली. कृषी दूतांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासह विविध योगासने व प्राणायाम करून त्यांना योगाचे प्रात्यक्षिक दाखवले. विद्यार्थ्यांनी योगासने व प्राणायम कशी करावी व त्याचा आरोग्यासाठी होणारे फायदे याची माहिती दिली. या उपक्रमात कृषीदूत श्रेयश जावळे, सुमित भोंग, कुणाल डांगे, यश आंबाडे, प्रवीण



दहे, मनीष गडाख, शाळेचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेत समाजात योगाबाबत जागरूकता निर्माण केली. मुख्याध्यापक यांनी मंगेश साळवे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकृष्ण हुरुळे,प्रा. संतोष चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी दत्तात्रय शिरसाठ, किशोर शिरसाठ, ऋषिकेश शिरसाठ यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते. मुख्याध्यापक मंगेश साळवे यांनी आभार मानले.

# 'प्रवरा गर्ल्स'चे जलतरण स्पर्धेत यश

## राजश्री मार्कंडे ठरली पाच पदकांची मानकरी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : ज्ञान साई हेल्थ क्लब, श्रीरामपूर यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हास्तरीय खुल्या जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १० ते १९ वर्षे वयोगटातील २०० हून अधिक मुलींनी सहभाग घेतला होता.

प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज लोणीच्या विद्यार्थिनींनी या स्पर्धेत भव्य यश संपादन केले, अशी माहीती प्राचार्या रेखा रत्नपारखी यांनी दिली. या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात इ. ७ वी मधील रिधिमा सोनवणे हिने ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्य पदक आणि १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये कांस्य पदक पटकावले.

१९ वर्षे वयोगटात, इ. १० वी मधील राजश्री मार्कंडे हिने ५० मीटर बॅकस्ट्रोक, बटरफ्लाय, फ्रीस्टाईल आणि १०० मीटर हेअरस्टाईल या चार प्रकारांमध्ये सुवर्णपदकांची कमाई केली, तसेच ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये रौप्य पदक मिळवत एकूण पाच पदकांची झळाळती कामगिरी केली.

तर विद्यार्थिनींपैकी, गौरी मजरे (इ. १० वी) हिला ५० मी. बटरफ्लायसाठी रौप्य व १०० मी. फ्रीस्टाईलसाठी कांस्य पदक, भाग्यश्री मार्कंडे (इ. १२ वी) हिला ५० मी. ब्रेस्टस्ट्रोकसाठी सुवर्ण व ५० मी. बॅकस्ट्रोकसाठी कांस्य पदक, तर सावरी देवीकर (इ. १० वी) हिला ५० मी. बॅकस्ट्रोकसाठी रौप्य पदक मिळाले.

या सर्व विद्यार्थिनींचा संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील सत्कार करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पोलिसांच्या दुर्लक्षामुळे कायदा-सुव्यवस्था कोलमडली

## सुनील मुथा यांचा प्रसिध्दीपत्रकाद्वारे आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : श्रीरामपूर व बेलापूर परिसरात पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष आणि अकार्यक्षमतेमुळे गुन्हेगारांचा सुळसुळाट झाला आहे. पोलिसिंग हा प्रकार औषधालाही उ लेला नाही, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते सुनील मुथा यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केला आहे. श्रीरामपूर व बेलापूर परिसरात बाहेरग वचे गुन्हेगार खुलेआम अवैध धंदे चालवत असून, गुटखाबंदी असताना गुटख्याची सर्रास विक्री, अमली पदार्थांची निर्मिती, गोवंश कत्तली यावर पोलिसांचा कोणताही अंकुश राहिलेला नाही, असे मुथा म्हणाले. जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिलेले असतान ही, कोपरगाव, शिर्डी, संगमनेर व सोनई परिसरातील गुन्हेगार श्रीरामपुरात 'बिंगो' नावाने जुगाराचे अड्डे चालवत असल्याचे मुथा यांनी निदर्शनास आणले. गुन्हेगारांचा मुक्तसंचार गावठी कट्ट्यांचा वापर, अल्पवयीन मुलींचे दिवसाढवळ्या अपहरण, अल्प्राझोलमसारख्या अमली पदार्थांचे तेलंगणाशी असलेले संबंध, यामुळे श्रीरामपूर परिसर गुन्हेगारांचे आश्रयस्थान झाल्याची टीका त्यांनी केली. बेलापूर पोलिस औटपोस्टसमोर टोळीयुद्ध होणे, कोल्हार रोडवरील एटीएम फोडण्याचा अयशस्वी प्रयत्न, झेंडा चौकातील वाहतुकीचा बट्याबोळ, टायर दुकान व व्यापाऱ्याचे अपहरण या सर्व घटनांकडे पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे त्यांनी नमूद केले. गुन्ह्यांची नोंद न करता तक्रारदारांची बोळवण केली जाते, केवळ तक्रार अर्ज घेऊन प्रकरण झाकले जाते, अशी गंभीर टीकाही मुथा यांनी केली. नवीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना जिल्ह्याचा अनुभव असल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा बेजबाबदारपणा थांबवतील अशी अपेक्षा मुथा यांनी व्यक्त केली. ''सदरक्षणाय खलनिग्रहणाय'' हे ब्रीदवाक्य कृतीत उतरावे, हीच अपेक्षा आहे, असेही त्यांनी नमूद केले.

गुटखा व गोवंश प्रकरणात संशयास्पद भूमिका गुटखा ट्रक प्रकरणात केवळ पंटरांना अटक होऊन प्रमुख आरोपी सुरक्षित राहणे, बेकरीत सापडलेले गोमांस व कोल्हार चौकाजवळ सुरू असलेली गोवंश कत्तल याकडे पोलिसांचे डोळेझाक असल्याचा आरोपही त्यांनी केला. ग्रामसभेने डीजे बंदीचा ठराव करून पोलिसांना लेखी कळवले असतानाही गावात खुलेआम डीजे वाजवले जातात. काही लोक माफक शुल्क घेऊन नवीन मिरवणुकांना परवानग्या मिळवत असून, या मिरवणुकांत तरुणांचा उन्माद दिसून येतो, असेही मुथा म्हणाले.

# गौतमच्या पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटचा उत्कृष्ट निकाल

## महाविद्यालयाचा ९६ टक्के निकाल




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : महाराष्ट्र राज्यात तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२५ पदविका अभियांत्रिकी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या गौतम पॉलीटेक्निक इन्स्टिट्यूटच्या सर्वच विभागांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयाचा शेकडा निकाल एकूण ९६ टक्के एवढा लागला आहे. महाविद्यालयात भाकरे हर्षदा बाबासाहेब ही ९२.४७ टक्के गुण मिळवून प्रथम, बहिरट अखिलेश दगेश ९२.२४ गुण मिळवून द्वितीय तर कु. चांदगुडे ईश्वरी विकास हिने ९०.४७ गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला असल्याची माहिती प्राचार्य सुभाष भारती यांनी दिली आहे. महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत प्रथम वर्षाचा एकूण शेकडा निकाल देखील ९६ टक्के एवढा लागला असून प्रथम क्रमांक होन दीपिका श्रीकांत ८५.४१ टक्के, द्वितीय क्रमांक अबक प्रतीक्षा अनिल ८३.६५, तर मोकळ सायली किरण ८१.०६ मिळवत तृतीय क्रमांक मिळविला आहे. द्वितीय वर्षाचा शेकडा निकाल एकूण ९८ टक्के एवढा लागला असून यामध्ये मेकॅनिकल विभागात प्रथम क्रमांक भोसले दीक्षा राजेंद्र ७७.६७, इलेक्ट्रिकल विभागात प्रथम क्रमांक मुरडणर अरुण नवनाथ ७६.४७, कॉम्प्युटर विभागात प्रथम क्रमांक गोरे सृष्टी गोपीनाथ ८८, सिव्हिल विभागात प्रथम क्रमांक जाधव यशराज नरेंद्र ७६.५६ टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक मिळविला आहे. तृतीय वर्षाचा शेकडा निकाल एकूण ९८% एवढा लागला असून यामध्ये तृतीय वर्ष मेकॅनिकल विभागात प्रथम क्रमांक घोडेराव श्रावणी भीमराव ८२.२२, इलेक्ट्रिकल विभागात प्रथम क्रमांक आढाव तुषार नामदेव ८३, कॉम्प्युटर विभागात प्रथम क्रमांक भाकरे हर्षदा बाबासाहेब ९२.४७, सिव्हिल विभागात प्रथम क्रमांक कांगणे पूजा सोमनाथ ८२ टक्के गुण मिळाले आहेत.

# दंडकारण्य अभियान पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ

## माजीमंत्री बाळासाहेब थोरात; थोरात कारखान्याच्या अतिथीगृहावर १९ दंडकारण्य अभियानाची नियोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले दंडकारण्य अभियानातून वृक्ष संवर्धन संस्कृती वाढली आहे. यावर्षीही गावोगावी मोकळ्या जागेत विविध डोंगरांवर वृक्षारोपण करण्यात येणार असून दंडकारण्य अभियान हे पर्यावरण संवर्धनाची मोठी लोक चळवळ ठरली असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अतिथीगृहावर १९ दंडकारण्य अभियानाची नियोजन बैठक झाली. यावेळी मुख्य प्रवर्तक मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डॉ. सुजित खिलारी, बाबुराव गवांदे, अनिल थोरात, सतीश गुंजाळ, बाळासाहेब सावंत, बाळासाहेब फापाळे, मधुकर गुंजाळ, नाम देव गुंजाळ यांच्यासह अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे अधिकारी व दंडकारण्य समितीचे सदस्य उपस्थित होते.

माजीमंत्री थोरात म्हणाले की ग्लोबल वार्मिंगच्या समस्येमुळे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ऋतूंमध्ये बदल झाला आहे. वाढलेली उष्णता आणि हवामानात होणारे बदल ही सजीव सृष्टीसाठी धोकादायक आहे. कोरोना संकटामध्ये ऑक्सिजन ची कमतरता जगाने अनुभवली. ऑक्सिजनच्या निर्मितीसाठी वृक्ष महत्त्वाची आहेत म्हणून सजीव सृष्टीच्या रक्षणासाठी प्रत्येकाने पर्यावरण संवर्धन हे मूलभूत कर्तव्य म्हणून बजावले पाहिजे. अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांच्या माध्यमातून आणि नागरिकांच्या सहकार्यातून तालुक्यातील विविध डोंगरांवर यावर्षीही वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

तर मा. आ. डॉ. तांबे म्हणाले की, माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यात वृक्ष संवर्धन संस्कृती वाढली आहे. प्रत्येकाला वृक्षांचे महत्त्व पटले असून कारखान्या-जवळील एटीपीचा डोंगर, खांडगाव कपालेश्वर, कोळवाडे येथील हरमन हिल, मोरया डोंगर, पिंपळगाव कोंझिरा कनकेश्वर, हिवरगाव पावसा येथील देवगड, कऱ्हे घाट, चंदनापुरी घाट, पेमगिरी शहागड, अशा विविध ठिकाणी संस्थांच्या माध्यमातून झालेल्या वृक्ष संवर्धनातून हा परिसर हिरवा दिसू लागला असून यावर्षीही सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दशरथ वर्पे यांनी केले. तर कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी आभार मानले. यावेळी अमृत उद्योग समूह विविध सेवाभावी संस्था व दंडकारण्य अभियान समितीचे सदस्य उपस्थित होते.

### चंदनापुरी व कऱ्हे घाटात फुलांचे रोपण

संगमनेर तालुक्यातून जाणाऱ्या नाशिक पुणे महामार्गात वर असणाऱ्या चंदनापुरी आणि कऱ्हे घाटामध्ये तसेच कोची, मल्हार घाट येथे ही रस्त्यांच्या दुतर्फा विविध रंगीबेरंगी फुलांचे रोपण दंडकारण्य अभियान समितीच्या वतीने करण्यात येणार असून गावागावांमध्ये जाणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फाही स्थानिक पातळीवर विविध फुलांचे रोपण करण्यात येणार आहे.



# डीवायएसपी खाडेंच्या नेतृत्वात पोलिसांची कारवाई

## पाथर्डी शहरात अवैध मावा पकडला; मशिनरीसह तिघांवर गुन्हा दाखल, एकजण फरार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी पाथर्डी शहरात धडाकेबाज कारवाई करत अवैध मावा विक्रीवर मोठा हात घातला आहे. तसेच शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारी वाहने, नंबर नसलेली वाहने आणि रोड रोमिओंचा बंदोबस्त करत काही मिळतात शहरातील गजबज हटवली. कोरडगाव चौक, नाईक चौक आणि अजंठा चौकातील कारवाईचा धसका घेत गर्दी अचानकच गायब झाली, तर फळांच्या गाड्या आणि गुंड प्रवृत्तीचे लोक भूमिगत झाले.

पाथर्डी शहरात पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी खंडोबा माळ, चिंचपुर रोड आणि कसबा पेठ येथे एकाच दिवशी छापा टाकत मोठ्या प्रमाणावर अवैद्य मावा विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. यामध्ये तीन ठिकाणांहून तब्बल ३.९४ लाख रुपये किमतीचा मावा व मशिनरीसह मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात रविंद्र पांडुरंग लगड, गणेश अशोक हारदे यांना अटक करण्यात आली असून, सुनील नाथा शिंदे हा पोलिसांना पाहून फरार झाला आहे. त्याच्या शोधासाठी विशेष पथक रवाना



करण्यात आले आहे.

ही कारवाई २१ जून रोजी सायंकाळी ४.३० ते रात्री ८.४५ वाजेच्या दरम्यान करण्यात आली. खाडे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, मावा तयार करण्याचा अवैध व्यवसाय पाथर्डी शहरातील विविध ठिकाणी सुरु असल्याची माहिती मिळताच सर्वप्रथम खंडोबा माळ येथील जिल्हा परिषद शाळेजवळील पत्र्याच्या गोडाऊनवर छापा टाकण्यात आला. त्याच्याकडून २३ किलो सुगंधीत तंबाखू, ८ किलो तयार मावा, मिक्सर मशिन, सुपारी कटिंग मशिन आदी मिळून आले. चिंचपूर रोड येथील गणेश अशोक हारदे याच्या घरी झडती घेतली असता ६५ पुडे सुगंधीत तंबाखू, ४ किलो मावा, मोठी व लहान मिक्सर मशिन मिळून आली. कसबा पेठ परिसरातील सुनील नाथा शिंदे याच्या पत्र्याच्या शेडवर धाड टाकण्यात आली असता तो पोलिसांना पाहून पळून गेला. त्याच्या शेडमध्येही मावा तयार करण्याचे साहित्य व मशिनरी सापडली.

या प्रकरणी विविध कलम न्वये तसेच अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आघरेशीय भुईमूग प्रात्यक्षिकासाठी बियाणे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : जळगाव येथील भुईमूग निदर्शनालय जुनागड व तेलबिया संशोधन केंद्र यांच्या समन्वयाने कोपरगाव तालुका कृषी बीज गुणन केंद्र येथे भुईमुगाचे कादरी लेपाक्षी वानाचे आघरेशीय प्रात्यक्षिकासाठी बियाणे वाटप करण्यात आले. संशोधन केंद्राचे प्रमुख दीपक दहाट यांच्या मार्गदर्शनाने व कोपरगाव तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली प्राध्यापक



पोपटराव खंडागळे यांनी कृषी विभागाच्या सचिन शिंदे यांच्या परिश्रमातून सदर कार्यक्रम संपन्न केला.

यामध्ये पढेगाव, शिरसगाव, मुर्शदपूर, सोनारी, वारी, येथील प्रयोगशील शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले.

यावेळी चांगदेव आहेर, बंडू भागवत, अशोक बनगडे, कोपरगाव कृषी साईनाथ मलिक, मंडळ कृषी अधिकारी सुनील गावित, ज्ञानदेव ठाकरे, संजय धनकुटे, अनिल शिंदे, राजेश तुंबारे, विशाल ससाने, विजय कोर, रवी गायधनी, मंडळ कृषी अधिकारी संगीता सोळशे, दीपक भागवत आदी उपस्थित होते. यावेळी मोफत बियाणे वाटप केल्याने शेतकऱ्यांच्या वतीने जळगाव येथील संशोधन केंद्राच्या सर्व टीमचे आभार मानले.

५१ टक्के पेक्षा अधिक तेलाचे प्रमाण तसेच जैविक, अजैविक तान सहन करण्याची उच्च क्षमता असल्याने हा वाण अतिशय दुर्गम परिस्थितीत देखील हेक्टरी २५ क्विंटल उत्पादन देतो. विशेष म्हणजे पाला हा शेवटपर्यंत हिरवा राहतो. त्यामुळे पशुधनाच्या चाऱ्याची व्यवस्था होते. त्यामुळे वानात बदल व नवीन वानाजी ओळख या उद्देशाने हा प्रयोग देण्यात आला आहे.

# दिंडीच्या पावलांनी पांढरी पुल घाट झाला ज्ञानेश्वरी घाट

## उदयन गडाखही चढले घाट; वारकऱ्यांच्या अभंगाने परिसर दुमदुमला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा नगरीतून पांडुरंगाच्या भेटीसाठी प्रथमच निघालेला ३० दिंड्यांचा ऐतिहासिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळा तिसऱ्या दिवशी पांढरी पुलापर्यंत पोहोचला. शिंगवे तुकाईच्या मुक्कामानंतर घाट चढताना टाळ-मृदंगाचा गजर आणि वारकऱ्यांचे टाळाचे आवाजाबरोबरच माऊलीच्या नावाचा जल्लोष यामुळे संपूर्ण घाट भक्तिरसात न्हालेला दिसला.

पुंडलीक वरदा विठ्ठल, श्री ज्ञानेश्वर माऊली, घाट चढती पाय वारकऱ्यांचे, नामस्मरण ओठी याप्रमाणे ऊन-पावसाची परवा न करता पांडुरंगाच्या भेटीने आसुसलेले वारकरी नेवासा ते पंढरीच्या मार्गावर असलेले सर्वात मोठे व अवघड चढण असलेले पांढरीपुलाचा घाट चढत असताना देखील आनंद घेत होते.

वारकऱ्यांचे हे नादमधुर अभंग परिसरात गुंजले आणि हे दृश्य पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने जमले त्याचबरोबर महामार्ग प्रवास करणारे प्रवासी भाविक देखील आवर्जून थांबून ज्ञानेश्वरीचे दर्शन घेत होते. पांढरी पुल हे ज्ञानेश्वरांच्या नेवासाच्या तालुक्याचे प्रवेशद्वार असल्याने या घाटाला ज्ञानेश्वरी घाट असे नाव देण्याची देविदास महाराज म्हस्के यांची इच्छा वारकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात उचलून धरली. यावेळी युवा नेते उदयन गडाख देखील दिंडी सोबत घाट चढत होते आणि भक्तिरसात न्हालेल्या या सोहळ्याला त्यांनी आपली उपस्थिती लावली आणि विठुरायाचा गजर करीत संतांचे आशीर्वाद घेतले

काल या ऐतिहासिक दिंडी सोहळ्याचे नगर शहरात आगमन झाले आणि क्लेरा बूस् स्कूलच्या पटांगणावर या पालखी सोहळ्यातील दुसरा रिंगण सोहळा पार पडला. पांढरी पुलाच्या घाटाचे नामकरण ज्ञानेश्वरी घाट होण्यासाठी प्रशासकीय बाबी शासन दरबारी लवकरात लवकर पूर्ण करू करणार आहे, असे माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी सांगितले.

# ... अखेर मुलांना शाळेत जाण्यासाठी मिळाला रस्ता

## दै. जनता आवाजचा दणका; वृत्त प्रकाशित होताच प्रशासनाकडून रस्त्याचा प्रश्न निकाली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : तालुक्यातील चिंचोली ते मोरे वस्ती व खंडाळा गोयकरवाडी हा रस्ता खुला करावा, असा तहसीलदार यांचा आदेश असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात येत नव्हती. विद्यार्थ्यांना महिलांना वृद्ध, नागरिक, शेतकरी या सर्वांना गुडघाभर पाण्यामधून जीव धोक्यामध्ये घालून जावे लागत होते.

पावसाळ्यामध्ये अनेक वेळा विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. ही बाब लक्षात आल्यावर आम्ही आमच्या दैनिक जनता आवाज वृत्तपत्रामधून या विरोधात आवाज उठवला. साहेब सांगा ना आम्ही अधिकारी कसे होणार.. हे वृत्त प्रसिद्ध होताच महसूल प्रशासनाचे तहसीलदार गुरु बिराजदार यांनी त्याची तात्काळ दखल घेतली.

स्वतः चिंचोली काळदाते या गावात भेट दिली. आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पोलीस बंदोबस्तामध्ये या रस्त्याचे काम जेसीबी लावून पूर्ण करून दिले व या पुढील काळात या रस्त्याम ध्ये कोणी अडथळा आणल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देखील तहसीलदार यांनी दिला.

कर्जत तालुक्यातील चिंचोली ते मोरे वस्ती व खंडाळा गोयकरवाडी हा रस्ता अनेक वर्षांपासून वहिवाटीचा होता. मात्र काही शेतकऱ्यांनी या रस्त्यावर अडथळा निर्माण केला होता. तत्कालीन तहसीलदार यांनी २०२३ यावर्षी हा रस्ता खुला करून देण्याबाबत लेखी आदेश देऊन निकालही दिला होता. मात्र तरीदेखील हा रस्ता खुला करण्यात आला नव्हता.

### दैनिक जनता आवाज वृत्तपत्राचे मानले आभार

तहसीलदार गुरु बिराजदार यांनी तात्काळ दखल घेत हा रस्ता खुला करण्याबाबत स्वतःच्या सर्व अधिकारांचा वापर करून नागरिकांना येण्या जाण्यासाठी रस्त्यावरील सर्व अडथळे दूर केले. यामध्ये रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या शेतकऱ्याने देखील सहकार्य करण्याची भूमिका घेतली यामुळे हा प्रश्न सुटला. ग्रामस्थांनी देखील या प्रश्नाला वाचा पडल्याबद्दल दैनिक जनता आवाज वृत्तपत्राचे आभार मानले.



### रस्त्यासाठी यांनी केले होते प्रयत्न

प्रा. परशुराम मोरे, नंदलाल काळदाते, योगेश मोरे, स्वप्नील मोरे, अशोक मोरे, शंकर मोरे, किशोर मोरे, शिवाजी मोरे, भाऊसाहेब मोरे, खकाळ मेजर, रामकृष्ण मोरे, माजी सरपंच परशुराम वरकटे, डॉ. बंकट काळदाते, सरपंच बापूसाहेब काळदाते यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

# नवनाथ बाबा पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** : शेवगाव-नेवासा राजमार्गावरील भातकुडगाव फाटा चौफुल्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या राजमार्गावरीलच भायगाव येथील ग्रामदैवत श्री नवनाथ बाबा रथासह पायी दिंडी सोहळ्याचे दि. २२ जूनला भायगाव येथील नवनाथ बाबा मंदिराच्या प्रांगणातून श्री.क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या वारीनिमित्त होत असलेल्या सोहळ्यासाठी मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले.

यावेळी भायगावसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विठ्ठल नामघोषाच्या जयजयकारात दिंडीचे शेकडे



वस्तीवरील नवनाथ बाबाच्या मंदिरात आगमन झाल्यानंतर माणिक शेकडे यांच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात आले. यंदाचे या दिंडी सोहळ्याचे २२ वे वर्ष आहे.

दिंडी चालक गहिनीनाथ महाराज आढाव, विष्णु महाराज दुकळे, अविनाश महाराज लोखंडे, महेश महाराज शेळके, भाऊसाहेब महाराज शेकडे व भायगाव येथील नवनाथ बाबा भजनी मंडळ व संयोजक समितीने उत्तम नियोजन केले आहे.

दिंडीच्या प्रस्थानावेळी भायगावचे सरपंच राजेंद्र आढाव,विकास सेवा संस्थेचे चेअरमन कल्याण आढाव, शेषेराव दुकळे, भगवान आढाव, जनार्दन लांडे, गणपत आढाव, हरिचंद्र आढाव, डॉ. विजय खेडकर, सुदाम खंडागळे, हरिभाऊ दुकळे, बाळासाहेब दुकळे, एकनाथ लांडे,कडूबाळ दुकळे, रामनाथ आढाव, बापूराव दुकळे,भागचंद धावणे, सदाशिव शेकडे, अशोक म्हसु दुकळे यांच्यासह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# श्रीरामपूर-राहुरीमध्ये बिबट्यांचे वाढते हल्ले

## आ. हेमंत ओगले यांनी वनमंत्री गणेश नाईक यांचे वेधले लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघां मध्ये होणाऱ्या बिबट्यांच्या हल्ल्यासंदर्भात राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक आणि आमदार हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृह, मुंबई या ठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह वनविभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघात वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्याकडे आ. हेमंत ओगले यांनी मंत्री गणेश नाईक यांचे लक्ष वेधले.

आ. ओगले म्हणाले की, शहर आणि गावाकडे येणारे सर्वच बिबटे हे नरभक्षक असून गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बिबट्यांचा वावर होताना दिसून येत आहे. त्यामध्ये मनुष्यहानी सोबतच पशुहानी देखील होताना दिसत आहे. त्यामुळे नागरिक व शेतकरी कायमचं भयभीत असतात. नरभक्षक बिबट्यांच्या संदर्भात राज्य शासन आणि केंद्र शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे आ. ओगले म्हणाले.

मंत्री गणेश नाईक म्हणाले की, बिबट्यांच्या हल्ल्या संदर्भात शासन संवेदनशील असून या विषयात लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्याच्या विचाराधीन असून बिबटे पकडण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या देखील वाढविली असल्याचे म्हटले.

आ. ओगले यांच्या मागणीनुसार श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघाकरिता अतिरिक्त पाच पिंजरे देण्याचे मंत्री मंत्री गणेश नाईक यांनी आश्वासित केले. त्यामुळे येणाऱ्या काळात बिबटे पकडणे अधिक सोयीचे होणार आहे.



# अकोल्यात बिबट्याचा विहिरीत बुडून मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील गणोर येथे एका बिबट्याचा विहिरीत पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

भक्षाच्या शोधात असलेला बिबट्या दि. २० जूनच्या रात्री बिबट्या गणोरे गावातील खतोडे वस्ती येथील मिलिंद मोहन दळवी यांच्या विहिरीत पडला. विहिरीतील पाणी खोल असल्याने व विहिरीचे बांधकाम आरसीसी असल्याने त्याला आधार घेता आला नाही. यामुळे त्याला स्वतःचा जीव वाचवता आला नाही.

बिबट्या पक्षाच्या शोधात रात्री विहिरीत पडला. मात्र तो रात्रभर जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होता. सकाळी काही शेतकऱ्यांनी बिबट्या विहिरीत पडलेला असल्याचे पाहिले. त्यावेळी तो विहिरीच्या वायरोपला धरून जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी काही शेतकऱ्यांनी वनविभागाला बिबट्या विहिरीत पडल्याची माहिती दिली. मात्र वन विभागाचे अधिकाऱ्यांनी वेळेत दखल न घेतल्याने बिबट्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.



### वनविभाग अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा नडला

वन विभागाने वेळीच दखल घेऊन बिबट्याला वाचवण्याचा प्रयत्न केला असता तर बिबट्या वाचला असता अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांचा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बिबट्याचा बळी देण्याची संतापजनक प्रतिक्रिया वन्य प्रेमींकडून केली जात आहे.

# जामखेड शहरात स्वस्तधान्याचा काळाबाजार!

## गोरगरिबांचे धान्य व्यापाऱ्याच्या दुकानात; तालुका पुरवठा अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यात स्वस्त धान्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरु असून गोरगरिबांना देण्यात येणारे धान्य महसूलमधील काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने थेट शहरातील काही दुकानदारांना पोहच केले जात असल्याचे चित्र तालुक्यात आहे. याकडे तहसीलदार यांच्यासह तालुका पुरवठा अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. जामखेड तालुक्यात रेशनच्या स्वस्त धान्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरु आहे. मागे दोन तीन महिन्यापूर्वीच काळ्याबाजारात



जाणारा रेशनचे धान्य तहसीलदारांच्या पथकाने पकडले होते. त्यानंतर हा प्रकार सुरूच असून याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होताना दिसत आहे. जामखेड

### मोफत धान्याचा होतोय काळाबाजार

शासकीय पोती बदलून पोतीमध्ये गहू व तांदूळ काळ्याबाजारात जात आहे आहे धान्याचा काळाबाजार करणारी टोळी सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. त्यातच 'शासकीय स्वस्त धान्य दुकानामार्फत अंतोदय, बीपीएल व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना तांदूळ व गव्हाचे वितरण स्वस्त दरात करण्यात येते. मात्र स्वस्त दुकानातून घेतलेले धान्य रेशन कार्डधारक चक्क व्यापाऱ्याला विकून मोकळे होत असल्याचे दिसून येत आहे.याप्रकरणी कारवाई करण्याचं सोडून प्रशासन पाठिशी घालत असल्याचा आरोप होतोय. सदर कारवाई झाल्यानंतर संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

येथील पुरवठा विभागात अधिकृत कर्मचारी कमी व खाजगी कर्मचाऱ्यांचा रुबाब वाढला आहे. यामुळे खालच्या अधिकाऱ्यांनी आपली पोळी भाजून घेण्यास सुरुवात केली आहे. तालुका पुरवठा विभागाच्या आशीर्वादाने 'तेरी भी चूप मेरी भी चूप' असा प्रकारचं खुले आम होत असतानाही जिल्हा पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनाही मलिदा देऊन गप्प केले जात असल्याने गरिबांचे धान्य माफियांच्या पोटात जात असल्याचे प्रकार चालू आहेत. त्यातच 'ई-पॉस' मशिन बसविण्यात आल्यानंतरही स्वस्त धान्य घोटाळा समोर आला आहे. रेशनच्या काळ्या बाजारात राजकीय पक्षाचे पदाधिकारीही गुंतल्याचाही आरोप होतोय. अधिकारी यासंदर्भात उघडपणे बोलण्यास नकार देत आहेत जिल्ह्यात स्वस्त धान्याचा पुरवठा करण्यात अनियमितता होत असल्याचे होणाऱ्या कारवाईवरून स्पष्ट होत आहे; मात्र त्यानं तरही याकडे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. शासनाचा तांदूळ काळ्याबाजारात जात असताना अनेकदा अशा प्रकारे घटना घडल्यावरही अधिकाऱ्यांनी कोणतीच ठोस भूमिका घेतली नाही. उलट दिवसेंदिवस काळ्याबाजारात स्वस्त धान्य विकण्याच्या घटना घडल्या आहेत. राजकीय वरदहस्त असल्याम ुळे तहसीलदार व पुरवठा अधिकारी कारवाईकडे कानाडोळा करत आहेत मात्र या सगळ्या प्रकारात लाभार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतोय.

# तनपुरेवस्ती रस्त्याचे काम बंद पाडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : भालगाव येथील १ किलोमीटर रस्त्याचे खडीकरणाचे निकृष्ट दर्जाचे सुरू असलेले काम अखेर ग्रामस्थांनी बंद पाडले. या कामाची निःपक्षपातीपणे चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी निवेदनाद्वारे वरिष्ठांकडे केली आहे. तालुक्यातील भालगाव येथील तनपुरे वस्ती रस्त्याचे काम सध्या सुरू होते. हे काम निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याबाबत ग्रामस्थांमधून सतत सांगण्यात येत होते. मुख्य रस्त्याच्या कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. या रस्त्याचे काम स्थानिक ग्रामस्थांची बंद पाडले. रस्त्याचे काम धिम्या गतीने व निकृष्ट दर्जाचे खडीकरण चालू होते. हे काम इस्टीमेट प्रम ाणे होत नसल्याने काम त्वरित बंद



तनपुरेवस्ती वरील मुले तीन दिवस झाली रस्त्याअभावी शाळेत नाही. वस्तीकडे गाड्या येणे जाणे बंद आहे. हा रस्ता लवकर झाला तर मुलांच्या शाळेचा प्रश्न सुटेल.
**-दगडू तनपुरे, ग्रामपंचायत सदस्य.**

करून उपविभागीय अभियंत्यांनी कामाची पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या निवदेनावर दादासाहेब खरात, रविंद्र राशिनकर, सतीष तनपुरे, दत्तात्रय भागवत, संजय तनपुरे, किरण तनपुरे, बाळासाहेब भांड, जनार्धन मुसमाडे बाळासाहेब भागवत, गणेश दातीर, प्रवीण खोसे यांच्यासह सर्व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# व्यापारी मंडळाकडून वारकऱ्यांना महाप्रसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : नगरमध्ये आलेल्या त्र्यंबकेश्वर येथील निवृत्ती महाराज आषाडी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीला मार्केटयार्ड व्यापारी मित्र मंडळच्या वतीने फराळ देण्यात आला.

गेली १३ वर्षे हा उपक्रम चालू आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अमोल पोखरणा यांनी दिली. मार्केटयार्ड मधील सर्व व्यापारी एकत्र येऊन वारकर्यांना आज एकादशी असल्याने फराळ देण्यात आला. यामध्ये साबुदाणा खिचडी, बटाटा चिवडा, लाडू, उपवासाची आमटी आदी होते. त्याचा लाभ सुमारे १७ हजारच्यावर वारकऱ्यांनी घेतला. दुपारी १ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत फराळ वाटप चालू होते. यावर्षी प्रशासनाने उत्तम सहकार्य केले व खुप चांगली व्यवस्था ठेवली, त्यामुळे सर्व व्यपाऱ्यानी मनपाचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व मार्केट परिसरातील सर्व व्यापाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# योग ही निरोगी जीवनशैली : राहिंज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात योग दिनाच्या निमित्ताने हजारो विद्यार्थ्यांनी योग शिक्षणाचे धडे गिरवले. यावेळी योगशिक्षक राहिंज बी.के. यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, विविध योगासने, सूर्यनमस्कार, विविध प्रकारच्या सूक्ष्म व्यायाम प्रकार, कवायत असा सर्वांग सुंदर व्यायाम कसा करावा, याबाबत मौलिक मार्गदर्शन केले. हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे योगाचे धडे गिरवले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, योगासन व व्यायाम फक्त योग दिनापुरता मर्यादित न राहता तो जीवनाचा अविवाज्य भाग बनला पाहिजे. त्यामुळे सुदृढ पिढी निर्माण होईल आणि त्यातूनच खऱ्या अर्थाने विकसित भारत निर्माण होऊ शकेल. त्यासाठी योगशिक्षण विषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात व्हायला हवा. विद्यालयाचे कला विभाग प्रमुख शरद शिरसाट यांनी संगीतमय व्यायाम प्रकारांनी कार्यक्रमात रंगत आणली. मंचावर पंचायत समिती शिक्षण विभागाचे निळकंठ बोरुडे, विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनिता काकडे, क्रीडा शिक्षक सचिन झगडे , सुवर्णा शेलार, ज्योत्स्ना लोखंडे, सीमा जगताप, विजया शेलार, स्वाती नरूटे, धनश्री नलगे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# आयटीआयला १ लाख किमतीचे मशीन भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : आपण समाजाचे काही देणे लागतो. या भावनेतून समाजकार्य करणारे अकोलेचे भूमिपुत्र, यशस्वी उद्योजक, प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनीचे डायरेक्टर तथा मालक माणिकराव डावरे यांनी अकोले आयटीआयला प्रॅक्टिकलसाठी १ लाख रुपये किमतीचे 'हॅक सॉ' मशीन भेट दिले. यावेळी कंपनीचे डायरेक्टर माणिकराव डावरे,



दीपक तारगे, अनुराग सेठ जैद (सभापती, खेड कृषी उत्पन्न समिती), उद्योजक संतोष पवळे, नितीन कड, पंडित कड, नितीन म्हसे, प्रमोद आठले, सेवा निवृत्त प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, भारत पिंगळे, शांताराम वैद्य, जि. प. प्रा. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रवींद्र वैद्य व सदस्य यांच्या उपस्थितीत प्राचार्य अरुण भालेराव, निदेशक पी .बी. नवले, दौलत धुमाळ यांचेकडे सुपूर्त केले.

# माहुली शिवारात बिबट्याचा धुमाकूळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : तालुका गंगापुर तालुक्यातील माहुली शिवारात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत असून, २२ जूनच्या रात्री झालेल्या हल्ल्यात कचरू कारभारी सुराशे यांची बकरी बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिक अक्षरशः दहशतीखाली जीवन जगत आहेत. गट क्रमांक ३९, ६० आणि ६५ या शिवारात बिबट्याचा वारंवार वावर असून, कधी पाळीव प्राण्यांवर, तर कधी रानडुकरांवर किंवा कुत्र्यांवर हल्ले होत आहेत. त्यामुळे शेतकरी, विशेषतः एकटे राहणारे व दुर्गम भागात शेती करणारे नागरिक, प्रचंड अस्वस्थ झाले आहेत.



या भागात शेतकरी मोठ्या प्रमाणात असून त्यांचं रोजचं शेतात जाणंही आता धोकादायक ठरत आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे रात्रीचं तर सोडाच, पण सकाळ-संध्याकाळच्या वेळेसही शेतात जाणं टाळलं जात आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांमध्येही भीतीचं वातावरण असून, अनेक पालक मुलांना शाळेत पाठवण्यास टाळाटाळ करत आहेत. परिस्थिती गंभीर असूनही वनविभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. बिबट्याला तात्काळ जेरबंद करण्यात यावं, अशी मागणी संतप्त ग्रामस्थांनी केली आहे.

# ओम शांतीचे कार्य मनाला स्पर्श करणारे

## आ. अमोल खताळ यांचे प्रतिपादन; गुणवंतांचा सन्मान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ओम शांती केंद्राच्या माध्यमातून योग, ध्यानधारणा आणि अध्यात्माच्या माध्यमातून सुरू असलेले कार्य मनाला स्पर्श करणारे आहे. येथील वातावरणात खऱ्या अर्थाने सकारात्मक ऊर्जा जाणवली, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर शहरातील गणेश नगर येथील ब्रह्मकुमारी ईश्वरीय

माझ्यावर लाडक्या बहिणींनी खूप प्रेम केले आहे. त्यांच्या कृपा आशीर्वादाने या तालुक्याचा लोकप्रतिनिधी झालो आहे. राखीपौर्णिमेच्यानिमित्त आपल्याकडे आयोजित होणारा कार्यक्रम ऐतिहासिक असेल, अशी मला खात्री आहे. मला तुमचा एक बंधू, एक मुलगा म्हणून स्वीकार. तुमच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे आ. अमोल खताळ यांनी यावेळी सांगितले.

विश्व विद्यालय या केंद्राच्या वतीने दहावी बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आ. खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ओम शांती केंद्राच्या प्रमुख भारती, पद्मा दीदी, डॉ योगिनी दीदी, विकास पुंड, संगीता पुंड, गलांडे आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, मुलांचं प्रेम, त्यांच्या नजरे तील निरागसता अन ओम शांतीच्या कार्यातली खरी श्रद्धा पाहून मनाला खूप सम ाधान वाटल आहे. लहानांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाच्या जीवनात आत्म शांतीची जागृती व्हावी, हा या केंद्राचा उद्देश नक्कीच सर्वांनाच प्रेरणादायक आहे.

# कोपरगावात आधार दुरुस्ती शिबीर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव येथे डाक विभाग आणि सूर्यतेज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने टपाल विभागाच्या 'डाक चौपाल' अभिनव उपक्रम आणि सूर्यतेज संस्थेच्या वतीने आधार कार्ड नवीन आणि दुरुस्ती शिबीराचे आयोजन ग्रामदैवत दक्षिणमुखी हनुमान मंदिरात करण्यात आले होते. या प्रसंगी सूर्यतेजचे सुशांत घोडके, डाक निरीक्षक अनंत सोनवणे, पोस्ट मास्तर राजेश नेतनकर, कैलास हाडोळे, डाक सहाय्यक विशाल गवळी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते. या आधार कार्ड शिबीरात नवीन जन्म झालेल्या पाच वर्षाच्या आतिल बालकांचे नविन आधार, आधारला मोबाईल नंबर लिंकिंग, आधार दुरुस्ती, बायोमेट्रिक दुरुस्ती अशा विविध दुरुस्त्या दोन दिवसीय शिबीरात करण्यात आल्या आहेत. या शिबीरात शहर व ग्रामीण भागातील १८६ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी कोपरगांव डाक विभागाचे राहुल डमाळे, विजय जोर्वेकर, शाखा डाकपाल स्वप्नील भगत, ओम दहीभाते, विजय गुंजाळ, बापूसाहेब चव्हाण, गौरव गाढे, गौरव वाघ, अर्जुनराव मोरे, संजय ढेपले, सूर्यतेजचे अनंत गोडसे यांचे सहकार्य लाभले.

# देशी वृक्षारोपण अभियानाची सुरुवात

## डॉ. आशिया यांना बेलाचे रोप देवून शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्षानिमित्त पर्यावरण प्रेमी सुशांत घोडके यांनी वृक्षारोपण आणि पर्यावरण अभियान २०२५ अंतर्गत 'शिवभक्त अहिल्यादेवी' या नावाने ३०१ बेल व देशी वृक्षारोपण अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना कार्यालयाच्या परिसरात रोपण करण्यासाठी बेलाचे रोप देवून केले. ३०१ बेल व देशी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ नुकताच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, कोपरगांवचे तहसिलदार महेश सावंत, निवासी नायब तहसिलदार प्रफुल्लीता



अहिल्यादेवी होळकर या शिवभक्त होत्या. काशी विश्वेश्वर पासून भारतातील अनेक शिवमंदिरांचा त्यांनी स्व:खर्चाने जिर्णोद्धार केला आहे. भगवान शिवाला बेलाची पान अर्पण करुन अनेक शिवभक्त आपली सेवा महादेवाला अर्पण करतात. तसेच आयुर्वेदातही बेल पानाला विशेष महत्त्व आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर झाले आहे. जिल्ह्याचे मुख्यालय हे अहिल्यानगर असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बेलाच्या झाडाचे रोपण करण्यासाठी व अहिल्यादेवी नावाने रोपण होणा-या ३०१ रोपांचे वितरण, रोपण आणि पालकत्व हे ३०१ व्या जयंती पर्यंत करणार असल्याचे घोडके यांनी सांगितले.

सातपुते, नायब तहसिलदार चंद्रशेखर कुलथे, कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदिप कोळी, कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार आदी याप्रसंगी उपस्थित होते. स्वच्छ भारत अभियानाचे घोडके हे स्वच्छतादूत असून अनेक ठिकाणी विविध फळ, फुल झाडांचे रोपण करुन पालकत्व दिले आहे. मागील अनेक वर्षात कोपरगांव, शिर्डी, राहाता, वैजापूर, सिन्नर या तालुक्यातसह विविध गावामध्ये एक व्यक्ती-एक झाड हा उपक्रम हाती घेऊन कडुलिंबासह विविध झाडांचे लोकसहभागातून रोपण करुन त्यांचे पालकत्व दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री' पुरस्काराने गौरविले आले आहे.

# पार्थ दोषी यांची निवड भूषणावह : सावंत

## श्रीरामपूरात 'गौरव भूमिपुत्राचा' कार्यक्रम उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : आयुष्यामध्ये खूप कमी लोकांना चांगल्या संधी मिळतात आणि त्याचा उपयोग समाज सेवेसाठी आणि राष्ट्र सेवेसाठी केला जातो. त्यापैकी पार्थ दोशी यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची मिळालेली संधी म्हणजे श्रीरामपूरकरांसाठी भूषणावह आहे. त्यांनी संधीचे सोने करावे, असे प्रतिपादन प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी केले आहे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य

अध्यक्षीय भाषणात अनिल कुलकर्णी म्हणाले की, या अगोदर जहीरखान याने श्रीरामपूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे. आता खेळाडू सोबतच क्रीडा व्यवस्थापन देखील सांभाळण्याची क्षमता येथील गुणवत्तेत असल्याचे सिद्ध झाले त्यांनी पार्थ दोशी यांची निवड 'सार्थ' आहे असे सांगून कौतुक केले व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

साधून येथील शासकीय विश्रामगृहात अँकर्स असोसिएशन व श्रीरामपूर पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गौरव भूमिपुत्राचा' या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते अध्यक्षस्थानी योग गुरु अनिल कुलकर्णी होते. यावेळी मंचावर स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि श्रीरामपूरचे भूषण सत्कारमूर्ती पार्थ दोशी, उद्योजक किशोर निर्मळ उत्तमराव केवळ, सुरेश जोशी कनकम दोशी, नेहा दोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्योजक उत्तमराव केवळ यांनी टिळकनगर जिमखान्यातील आठवणींना उजाळा दिला व पार्थ यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उद्योजक किशोर निर्मळ म्हणाले की श्रीरामपूर सारख्या भागातून येऊन सुद्धा पार्थ याने मोठी झेप घेतलेली आहे सर्व श्रीरामपूरकरांच्या शुभेच्छा त्याच्या पाठीशी राहतील.

# डिजिटल जगातला अनोखा उद्योग

आपण जगात कुठेही असलो तरी विकसित तंत्रज्ञानामुळे आपले काम कुठेही अडत नाही. गिऱ्हाईक जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात असला तरी उद्योजक, व्यावसायिक त्याच्याशी सहजरित्या संपर्क साधू शकतात. याच पार्श्वभूमीवर सोलापूरातील अरविंद रंगा या तरूण उद्योजकाने 'डिजि-ट्विन इंजिनियरिंग सर्व्हिसेस'च्या माध्यमातून अत्यंत वेगळ्या, प्रगत उद्योगात यशस्वी पाऊल टाकले. वास्तुकलेतील पदवी घेतल्यानंतर आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल डिझाईन, तसेच बांधकाम व्यवस्थापनाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामे करणाऱ्या अरविंद यांच्या कल्पकतेचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. सोलापूरमधल्या स्वतःच्या कार्यालयात बसून जगभरातील बांधकाम क्षेत्रातील ग्राहकांसाठी ते 'बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग' अर्थात 'बीआयएम'चे काम करतात. सुरूवातीला 'विप्रो'मध्ये कार्यरत असणाऱ्या अरविंद यांना चार वर्षे दुबई, एक वर्ष कतार, हैदराबाद, पुणे आणि सोलापूर येथील कंपन्यामधला जवळपास पंधरा वर्षांचा उद्योगाचा अनुभव आहे. अभियांत्रिकीशी संबंधित ३० जणांचा त्यांचा स्टाफ आहे तर ७५ जणांना त्यांनी इंटर्नशिप दिली आहे. वर्षाला लाखो रूपयांची उलाढाल करणारी त्यांची प्रगती थक्क करणारी आहे.

लाख रूपयांची नोकरी सोडून त्यांनी स्वतचा उद्योग सुरू करण्याचे ठरवले. परंतु, कोणतीही रिस्क न घेता आणि सुरू असलेली नोकरी न सोडता डिजिटल क्षेत्रातील उद्योग कसा सुरू करता येईल, याविषयी अरविंद यांचा विचार सुरू होता. त्यामुळे त्यांनी घरामध्येच ऑफिस सुरू केले. सोलापुरातील विद्यार्थी इंजिनियरिंगची पदवी घेतल्यानंतर सोलापूर सोडून अन्यत्र नोकरीला जातात. परगावात आपल्या कौशल्याने चमकतात, मग ही प्रतिभावान तरुणाई सोलापुरमध्येच थांबवली पाहिजे. आपल्या शहराचा विकास झाला पाहिजे, ही तळमळ त्यांना होती. अनुभवाची शिदोरी बरोबर होतीच म्हणून 'डिजि-ट्विन' या कंपनीची स्थापना त्यांनी केली. नोकरीनिमित्त संपर्कात असलेल्या कंपन्यांशी त्यांनी संवाद साधला आणि 'डिजि-ट्विन'साठी कामे घ्यायला सुरूवात केली. कामातले कौशल्य पसंतीस उतरल्यामुळे साहजिकच कामे वाढू लागली. सोलापूरमध्ये त्यांनी बी.ई., बी.टेक, इंजिनियरिंग डिप्लोमा अगदी आय.टी.आय. ड्राफ्ट्समनचा डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यातील उत्तम काम करणाऱ्यांना कंपनीत नोकरी दिली. याआधी नोकरी करत असलेल्या कंपनीबरोबर ते आता पार्टनरशिपमध्ये काम करत आहेत.

**अचिव्हर**

आभासी रचना बांधकामाचे मॉडेलिंग करून देणे हा त्यांच्या कंपनीच्या कामाचा मुख्य उद्देश आहे. ते स्वतः आर्किटेक्ट आहेत. विविध बांधकाम प्रकारांची तसेच ऑटोडेस्क, ऑटोकॅड, रेविट, बीआयएम ३६०, २डी, ३डी सॉफ्टवेअर्सच्या तांत्रिक साधनांचा उत्तम अनुभव त्यांच्या ठायी आहे. त्यांचे बांधकाम रचनेची रेखाचित्रे तयार करण्याचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. त्यामुळेच त्यांना जगभरातील मोठ्या कंपन्यांची कामे मिळतात. मोठ्या बहुमजली इमारतींचे थ्रीडी आर्किटेक्चर ते करून देतात. त्यांची कंपनी स्थापत्यशास्त्रातील विविध कामे करते. अरविंद रंगा यांनी आपल्या अंगभूत गुणवत्तेने अल्पावधीतच मोठी झेप घेतली. अगदी तरुणवयात स्वत:बरोबरच या क्षेत्रातील तरुण पदवीधर आणि तंत्रज्ञांना संधी देण्याचे काम ते करत आहेत. आईचे संस्कार, पत्नीची साथ आणि मित्रांनी वेळोवेळी केलेली मदत आणि सहकार्यामुळे आपण यशस्वी होऊ शकलो, असे ते नम्रपणे सांगतात. येत्या काळात आपल्या उत्कृष्ट कामाने जगभरात विस्तार करण्याचे त्यांचे व्हिजन आहे. त्यांचे कर्तृत्व पाहता ते लवकरच सफल होईल, यात शंका नाही.



# ध्या त्वचेची योग्य काळजी



त्वचेवरील मुरुमं, डाग, डोळ्याखालील काळी वर्तुळं किंवा कोरड्या त्वचेसारख्या समस्यांवर चेहऱ्यावर कुठले तरी क्रीम, फेसमास्क, फेसपॅक लावत असाल तर, त्याचा तात्पुरता उपयोग किंवा परिणाम तुम्हाला नक्कीच जाणवेल. मात्र या गोष्टी वापरणे बंद केल्यावर, त्वचा पुन्हा आधीसारखी होऊ लागते. असे होऊ द्यायचे नसेल तर स्किन केअरबरोबर पोषक आहार असणे खूप गरजेचे असते. * **त्वचा हायड्रेटेड ठेवणे:** पाणी पिणे ही सवय आपल्या शरीरासाठी किती महत्त्वाची आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळे आपल्या त्वचेला तजेला देण्यासाठी, त्याला कोरडे होण्यापासून वाचवण्यासाठी दररोज योग्यप्रमाणात पाणी पिणे अतिशय गरजेचे असते. * **पौष्टिक आहार:** त्वचा उत्तम राहण्यासाठी आपल्या शरीराला आतून पोषण मिळणे गरजेचे असते. त्यामुळे आहारात भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने इत्यादी पोषक घटक असणारे पदार्थ घ्यावे. विविध फळं, भाज्या-पालेभाज्या, डाळी, सुकामेवा; मांसाहार करत असल्यास अंडी, मासे यांसारख्या गोष्टींचा समावेश करा. यामुळे केवळ त्वचेलाच नाही तर तुमच्या संपूर्ण शरीराला उपयोग होईल. * **क्लिंझिंग:** दररोज रात्री झोपण्यापूर्वी तुमचा चेहरा स्वच्छ करून करून मगच झोपावे. मेकअप लावला असल्यास तो न चुकता काढून टाकावा. यासाठी तुम्ही सौम्य क्लिंझिंगचा वापर करू शकता. * **मॉइश्चरायझर:** त्वचेचे रक्षण करण्यासाठी दररोज, एखाद्या सौम्य मॉइश्चराइजरचा वापर करावा. यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाही आणि त्वचा मऊ राहण्यास मदत होते. * **योग्य प्रमाणात झोप घेणे :** शक्यतो ७ ते ८ तासांची झोप घेण्याचा प्रयत्न करा. रात्री आपण झोपलेलो असतो; मात्र आपले शरीर, आपल्या पेशींना पुनरुज्जीवित करण्याचे काम करत असतात. त्यामुळे आपली त्वचा तरुण दिसण्यास मदत होते. म्हणून योग्य प्रमाणात झोप घेणे महत्त्वाचे असते. * **ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा:** अतिरिक्त ताणाचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्यामुळे योगा, ध्यान किंवा दीर्घ श्वासोत्श्वास करून आलेला ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा. * **धूम्रपान करणे टाळावे:** धूम्रपान करण्यामुळे आरोग्याला हानी पोहोचते. तसेच याचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्वचा सैल पडणे, चेहऱ्यावर सुरकुत्या येणे यासारख्या समस्या धूम्रपान केल्याने उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी धूम्रपान करू नये.

**फॅशन पॅशन**

# नातं कसं टिकवू?



मी २८ वर्षांचा तरुण असून याआधीच्या तीन नातेसंबंधांमध्ये मला अपयश आलं आहे. यामागची कारणं वेगवेगळी असली तरी भविष्यातलं कोणतंच नातं टिकाणार नाही, अशी भीती माझ्या मनात निर्माण झाली आहे. मध्यंतरी आमच्या शाळेचं रियुनियन होतं. त्यावेळी भेटलेल्या एका मैत्रिणीसोबत मी आता रिलेशनशीपमध्ये आहे. हे नातं तिने गांभीर्याने घेतलं आहे. तिला माझ्याशी लग्नही करायचं आहे. मला ती आवडत असली तरी तिच्याबद्दलची माझ्या मनातली नेमकी भावना मला कळत नाही. ती मला सोडून जाणार नसल्याने या नात्यात रहावं असं वाटून जातं. पण फक्त यामुळे मी तिच्याशी लग्न करावं का?

उत्तर : मित्रा, स्वत:ला थोडा वेळ देऊन मागे वळून बघ. आधीच्या नात्यांमधल्या अपयशांच्या कारणांचा आढावा घे. कुठे काय चुकलं हे समजून घे. नवं नातं निर्माण करताना काय टाळायला हवं हे ठरव. आपल्याला भूतकाळ बदलता येणार नाही. पण चुका सुधारून नक्कीच पुढे जाता येईल. अर्थात हे सोपं नाही. आधीच्या नात्यांमध्ये तू बरेच चढउतार अनुभवले. पण भविष्यात तुझं नातं चांगलं फुलू शकतं. स्वत:ला थोडा वेळ दे. तुझे विचार, वागणूक,भावभावना यांकडे डोळपणे बघ. गरज पडली तर समुपदेशकांनी मदत घे.

**मॅच मेकिंग**

# का दुखते पाठ?

चालणं हा सर्वोत्तम व्यायाम असल्याचं म्हटलं जातं. अगदी साधा, सरळ आणि सोपा असा हा व्यायाम कोणीही, कधीही करू शकतं. चालल्यामुळे बरेच लाभ होतात. अर्थात प्रत्येकाला चालण्याचा व्यायाम जमतोच असं नाही. चालल्यानंतर काहींना पाठीच्या दुखण्याचा त्रास जाणवू शकतो. त्यातच पाठीचं दुखणं असणाऱ्यांच्या समस्येत अधिकच भर पडू शकते. कोणत्या चुकांमुळे चालल्यानंतर पाठीचं दुखणं मागे लागू शकतं? जाणून घेऊ.

**फिटनेस फंडा**

* चालल्यानंतर पाठीच्या खालच्या भागात दुखू शकतं. स्थूल तसंच वजन कमी असणाऱ्या लोकांना हा त्रास होऊ शकतो. अशा लोकांच्या शरीराच्या मधल्या आणि खालच्या भागात जास्त वजन असतं. यामुळे चालताना पाठीच्या खालच्या भागाला अधिक भार सहन करावा लागतो. या अतिरिक्त भारामुळे पाठीच्या स्नायूंवर ताण येऊन वेदना जाणवतात.



* स्नायूंवर अतिरिक्त ताण आल्यानेही तुम्हाला त्रास होऊ शकतो. यासोबतच लिगामेंट फाटल्यामुळेही पाठीचं दुखणं मागे लागू शकतं.
* मसल स्पॅममुळेही पाठीच्या खालच्या भागाचं दुखणं मागे लागू शकतं. अर्थात हा त्रास फार काळ टिकून राहत नाही. गरम पाण्याचा शेक दिल्यानंतर हा त्रास दूर होतो.
* चालणं हा सर्वसामान्य व्यायामप्रकार असला तरी चालताना शरीराची स्थिती योग्य असणं आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने चालल्यामुळेही तुम्हाला त्रास होऊ शकतो.

म्हणूनच पाठीचं दुखणं टाळण्यासाठी योग्य पद्धतीने व्यायाम करायला हवा.

# निसर्गरम्य कानाताल

दोस्तांनो, पावसाळा सुरू होतोय. लवकरच पर्यटनाला सुरूवात होईल. तुम्हीही या सदाबहार मौसमात भटकंतीला बाहेर पडण्याची संधी शोधत असाल. पण सध्याचे बदलते वातावरण, पावसाळ्यात हमखास दुर्घटना घडणारी ठिकाणे यांची अवश्य माहिती घ्या. पर्यटनाच्या दृष्टीने सुरक्षित ठिकाणांचा शोध घेणं आवश्यक आहे. असंच एक ठिकाण म्हणजे उत्तराखंडमधलं कानाताल नावाचं गाव. कानाताल देहरादूनपासून ८० किलोमीटर अंतरावर असून मसुरीपासून बारा किलोमीटर अंतरावर आहे. हे स्थान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.

कानातालमध्ये कोदिया जंगल असून इथे ट्रेकिंगचा आनंद घेता येईल. बरेच पर्यटक या जंगलात सहल काढतात. इथल्या निसर्गरम्य वातावरणात मन आनंदित होऊन जातं. इथे सुरकंडा देवीचं मंदिर असून हे स्थान देवीच्या ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे.

**भटकंती**

सती देवीचं डोकं याठिकाणी पडल्याचं म्हटलं जातं. हे मंदिर खूप सुंदर असून हिमालयाच्या कुशीत वसलं आहे. या गावात राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. इथे स्थानिकांसोबत राहता येतं. तसंच स्थानिक भोजनाचा आस्वादही घेता येतो. फारशी वर्दळ नसणारं हे ठिकाण पर्यटकांना नक्कीच आवडेल. एखाद्या शांत आणि सुंदर ठिकाणी भटकंती करायची असेल तर कानातालची निवड करता येईल.



# नोकरीच्या मुलाखतीला जाताय?

आयुष्यात पहिल्यांदाच मुलाखत देणार असाल तर काही बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे. ज्याचे पालन करून मुलाखतीला धीराने सामोरे जाऊ शकाल. आत्मविश्वास बाळगा: कोणतीही नोकरी मिळविण्यासाठी केवळ शैक्षणिक पात्रता आणि कौशल्य आवश्यक नाही, तर तुम्ही तुमचा मुद्दा पूर्ण आत्मविश्वासाने मांडणेही खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुलाखत देताना १०० टक्के आत्मविश्वास बाळगा.

* देहबोलीचीही काळजी घ्या: मुलाखतीदरम्यान देहबोलीचीही काळजी घ्यावी लागते. मुलाखतीसाठी जाताना चालण्याच्या, बसण्याच्या पद्धती योग्य असाव्यात.
* आयकॉन्टॅक्ट टाळू नका : मुलाखत देताना आयकॉन्टॅक्ट टाळू नये. अस्वस्थ झाल्यामुळे इकडे तिकडे बघत उत्तरे देणे टाळा. त्यामुळे चुकीचा अर्थ जाण्याची शक्यता असते.
* कंपनीची माहिती ठेवा: इंटरव्हू देत असलेल्या कंपनीची माहिती मिळवा. यासाठी संबंधित कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन तपशील मिळवू शकता. यामुळे चांगली छाप पडते. यासोबतच तुम्ही या नोकरीबाबत खरोखरच गंभीर आहात, असेही मुलाखतकाराला वाटते.

**वेगळ्या वाटा**






## शेर की जुबानी

अजब सिलसिला है
बीतती रातों का यहां,
आंखो में कभी ख्वाब रहा,
कधी ख्याल रहा

शोर यूं ही न परिंदो ने
मचाया होगा,
कोई जंगल की तरफ,
शहर से आया होगा।

फोन के रिश्ते भी अजीब होते हैं।
बॅलन्स रखकर भी लोग गरीब होते है,
खुद तो मेसेज करते नहीं,
मुफ्त के मेसेज पढने के शौकिन होते हैं।

## स्मार्ट टीप्स

### इंटरनेट स्लो झालं आहे?

सध्या बरेच जण घरून काम करत असल्यामुळे इंटरनेट मोठ्या प्रमाणावर वापरलं जात आहे. त्यामुळे इंटरनेटचा स्पीड कमी होऊ शकतो. फोनमधील कॅचे काढून टाका. हे कॅचे वेळोवेळी काढून टाकणं आवश्यक आहे. कॅचे क्लिअर केले नाहीत तर फोनमधल्या इंटरनेटचा स्पीड कमी होतो. एपीएन सेटिंग्जकडे लक्ष द्या. एपीएन म्हणजे ॲक्सेस पॉईंट नेटवर्क. एपीएन सेटिंग्ज योग्य नसेल तर इंटरनेटचा स्पीड कमी होतो. फोनच्या बॅकग्राउंडमध्ये एखादं ॲप सुरू असल्यास डाटा खर्च होत राहतो. म्हणूनच असं एखादं ॲप बंद करून टाका. अशा पद्धतीने तुम्ही तुमच्या मोबाईल डाटाचा स्पीड वाढवू शकता.

## व्हॉट्स न्यू?

### व्हॉट्सॲपचे नवीन सुरक्षा फीचर!

व्हॉट्सॲपने आपल्या यूजर्ससाठी स्क्रीनशॉट ब्लॉकिंग फीचर आणले आहे. युजर्सची प्रायव्हसी लक्षात घेऊन हे फिचर सादर करण्यात आले आहे. स्क्रीन ब्लॉकिंग फिचरच्या मदतीने, वापरकर्ते एकदा पहा म्हणून पाठवलेले व्हिडिओ आणि फोटोंचे स्क्रीनशॉट घेऊ शकणार नाहीत. व्हॉट्सप व्ह्यू वन्स फोटो आणि व्हिडिओची नवीन आवृत्ती रिलीज करणार आहे. वापरकर्त्याला स्क्रीनशॉट आणि स्क्रीन रेकॉर्डिंग करण्यापासून प्रतिबंधित करून वापरकर्त्यांची गोपनीयता सुधारणे हा त्याचा उद्देश आहे. सध्या, हे वैशिष्ट्य फक्त काही बीटा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. यासाठी यूजर्सला गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सपचे नवीन बीटा व्हर्जन डाउनलोड करावे लागेल.



## ॲप वर्ल्ड

### फोनमधून 'ही' फाईल त्वरित काढा!

कॅशे साफ करण्यासाठी तुमच्या अँड्रॉइड फोनमधल्या सेटिंग्ज मेनूमधल्या 'स्टोरेज' सेक्शनमध्ये जा. ॲपमधला डेटा साफ करायचा आहे त्याची निवड करा. ॲपच्या सेटिंग्जमध्ये तुम्हाला 'क्लिअर कॅशे' आणि 'क्लिअर स्टोरेज' असे पर्याय दिसतील. तात्पुरत्या फाइल्स हटवण्यासाठी 'क्लिअर कॅशे'वर टॅप करा. 'क्लिअर स्टोरेज' हा पर्याय फार सावधगिरीने निवडा. कारण, या ऑप्शनमुळे सर्व डेटा नाहीसा होऊ शकतो. कॅशे क्लिअर न केल्यामुळे फोनचा परफॉर्मन्स बिघडू शकतो. कॅशे फाइल्स साठवल्या जातात आणि कालांतराने तुमच्या फोनची स्टोरेज स्पेस आणि सिस्टीम भरते. फोनचं स्टोरेज फुल असल्यामुळे अनेक समस्या उद्भवतात. उदाहरणार्थ, ॲप लोड होण्यासाठी जास्त वेळ लागतो. दोन ॲप्समध्ये स्विच करण्यास वेळ लागतो आणि फोन हळूहळू काम करण्यास सुरवात करतो.

## स्मार्ट ट्रिक्स

### असं शोधा अधिक रॅम वापरणारं ॲप

मल्टीटास्किंगसाठी अधिक रॅम असणारा मोबाईल खरेदी केला जातो. मात्र सततच्या वापरामुळे मोबाईलचा वेग मंदावतो. आपली कामं झटपट होत नाहीत. एखाद्या ॲपमुळे असं होऊ शकतं. सोशल मीडिया ॲप्स तसंच ग्राफिक गेम्स फोनमधल्या रॅमचा अधिक वापर करतात. याच कारणामुळे फोन मंद गतीने काम करू लागतो. आता फोनची गती मंद करणारी ॲप्स कशी शोधून काढायची तर त्यासाठी तुम्हाला युक्ती करावी लागेल. तुम्हाला सर्वात आधी सेटिंग्जमध्ये जावं लागेल. इथे स्टोरेज किंवा मेमरी पर्यायावर क्लिक करा. मग तुम्हाला मोबाईलची किमी मेमरी वापरली आहे हे कळेल. कोणत्या ॲपने किती जागा व्यापली आहे हे बघा. यासाठी मेमरी युज्ड बाय ॲप्सवर क्लिक करा. इथे तुम्हाला कोणतं ॲप किती रॅम वापरतं हे कळेल. अधिक रॅम व वापरणारं ॲप तुम्ही डिलिटही करू शकता.



# चटपटीत चिप्स भेळ

दोस्तांनो, संध्याकाळच्या वेळी काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. अशावेळी पटकन भेळेचा पर्याय निवडला जातो. भेळ म्हटली की चुरमुरे हवेत. पण तुमच्याकडे बटाटा वेफर्सचं एखादं पाकिट असलं तरी भेळ बनवता येईल. चला तर मग, पटकन होणारी ही रेसिपी ट्राय करू या.

**सामग्री:** बटाटा वेफर्स, चिरलेला कांदा, टॉमेटो, हिरव्या मिरच्या, फरसाण, शेव, लिंबाचा रस

**कृती:** बटाटा वेफर्सचे छोटे तुकडे करा. त्यात कांदा, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नीट मिसळून घ्या. मग फरसाण आणि शेव घालून थोडा लिंबाचा रसही घाला. सर्व घटक नीट मिक्स करा. वेफर्स, फरसाणात मीठ असतंच. तुमच्या चवीनुसार मीठ घाला. वरून कोथिंबिरही घालता येईल. संध्याकाळच्या चहासोबत ही चिप्स भेळ मस्त लागेल. इतकंच नाही तर मित्रमंडळींकडून तुमच्या कल्पकतेचं कौतुकही होईल.

**झटपट रेसिपी**

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11